# विद्या

वार्षिकांक-२०१९-२०



शिक्षण प्रसारक मंडळाचे...

**तात्यासाहेब महाजन कला व वाणिज्य महाविद्यालय, चिखली.जि.बुलडाणा**

NAAC B Grade ने पुनर्मूल्यांकित


४४३२०१ फोन :२४०६४-२४२०७५

www.spmtmchikhali.ac.in

Email:principaldrtarespmchikhli@gmail.com

# शिक्षण प्रसारक मंडळ,चिखली

## * कार्यकारी संचालक मंडळ *



मा. श्री. रामकृष्णदादा शेटे
अध्यक्ष



मा. श्री. नारायणराव राजपूत
उपाध्यक्ष



मा. श्री. प्रेमराजजी भाला
सचिव



मा. श्री. कैलासजी शेटे
सहसचिव



मा. ॲड्. विजयजी कोठारी
कोषाध्यक्ष



मा. श्री. भाऊसाहेब लाहोटी
संचालक



मा. श्री. नानासाहेब लंके
संचालक



मा. श्री. रामदासजी निमावत
संचालक



मा. श्री. नानासाहेब बाहेकर
संचालक



मा. श्री. सतीशजी गुप्त
संचालक



मा. श्री. अशोकराव वैद्य
संचालक

।। विद्या परं दैवतम्।।

शिक्षण प्रसारक मंडळाचे...

## तात्यासाहेब महाजन कला व वाणिज्य महाविद्यालय,चिखली.जि.बुलडाणा

# विद्या

**वार्षिकांक -२०१९-२०**

### मुख्य संपादक



**प्राचार्य डॉ.सुभाष ज्ञा. गव्हाणे**

### कार्यकारी संपादक



**प्रा.शरद तु. रावे**


**कनिष्ठ महाविद्यालय विभाग**



**प्रा.डॉ. प्रदिप हिं. बारड**

**ग्रंथालय विभाग प्रमुख तथा सहयोगी प्राध्यापक**

# राष्ट्रगीत



जन गण मन अधिनायक जय हे
भारत भाग्य विधाता
पंजाब सिंध गुजरात मराठा
द्राविड़ उत्कल बंग
विन्ध्य हिमाचल यमुना गंगा
उच्छल जलधि तरंग
तव शुभ नामे जागे
तव शुभ आशिष मागे
गाहे तव जय गाथा
जन गण मंगल दायक जय हे
भारत भाग्य विधाता
जय हे जय हे जय हे
जय जय जय जय हे

# भारताचे संविधान

## प्रास्ताविका

आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम
समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य घडवण्याचा
व त्याच्या सर्व नागरिकांस :
सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय ;
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रध्दा
व उपासना यांचे स्वातंत्र्य ;
दर्जाची व संधीची समानता ;
निश्चितपणे प्राप्त करुन देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी बंधुता
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करुन;
आमच्या संविधानसभेत
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित
करुन स्वत:प्रत अर्पण करत आहोत.

**भारतीय संविधानाचे शिल्पकार**
**भारतरत्न डॉ.बी.आर.आंबेडकर**

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | | पृष्ठ क्र. | अ.क्र. | | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | राष्ट्रगीत | ०२ | २७ | शारिरीक शिक्षण विभाग | २९ |
| ०२ | संविधान प्रास्ताविका | ०३ | २८ | राष्ट्रीय सेवा योजना अहवाल | ३१ |
| ०३ | संपादकीय | ०५ | २९ | राष्ट्रीय छात्र सेना | ३४ |
| ०४ | महाविद्यालय विकास परिषद | ०६ | ३० | विद्यार्थी विकास मंडळ | ३६ |
| ०५ | प्राध्यापक व कर्मचारी वृंद | ०७ | ३१ | विद्यार्थी कल्याण | ३७ |
| | **साहित्य विभाग** | | ३२ | सांस्कृतिक विभाग | ३८ |
| ०६ | संघ गंगोत्रीचे भगीरथ | ०८ | ३३ | मुक्त विद्यापीठ अहवाल | ३९ |
| ०७ | बालरोजगार एक समस्या | १० | ३४ | पालक संपर्क व मेळावा | ४० |
| ०८ | हिंस्त्र पशु | ११ | ३५ | स्पर्धा परिक्षा | ४१ |
| ०९ | सखी | ११ | ३६ | करियर कौन्सीलिंग अॅन्ड प्लेसमेंट | ४२ |
| १० | ओळख  खऱ्या प्रेमाची | १२ | ३७ | स्टाफ अकॅडमी अहवाल | ४३ |
| ११ | आई | १३ | ३८ | पर्यावरण व नेचर क्लब अहवाल | ४४ |
| १२ | आयुष्य | | ३९ | ग्रंथ वितरण | ४५ |
| १३ | तुला सोडलं | | ४० | आजिवन शिक्षक व विस्तार सेवा विभाग | ४६ |
| १४ | बहीण | १४ | ४१ | पुरस्कार व शिष्यवृत्ती वितरण अहवाल | ४७ |
| १५ | मैत्री | | ४२ | १५ ऑगस्ट पुरस्कार वितरण | ४८ |
| १६ | आई | १५ | ४३ | २६ जानेवारी पुरस्कार वितरण | ५१ |
| १७ | आयुष्य | | ४४ | क्रीडा क्षेत्रातील पुरस्कार | ५३ |
| १८ | आई | १६ | ४५ | पसायदान | ५६ |
| १९ | आठवण मैत्रीणीची | | | | |
| | **विविध उपक्रम अहवाल** | | | | |
| २० | मराठी विभाग | १७ | | | |
| २१ | इंग्रजी विभाग | १८ | | | |
| २२ | अर्थशास्त्र विभाग | १९ | | | |
| २३ | इतिहास विभाग | २२ | | | |
| २४ | राज्यशास्त्र विभाग | २४ | | | |
| २५ | वाणिज्य विभाग | २६ | | | |
| २६ | ग्रंथालय विभाग | २८ | | | |



# संपादकीय.....

आज कोरोनाच्या विषाणूमुळे जग एक वेगळयाच वळणावर येऊन उभे ठाकले आहे. गरीब-श्रीमंत, विकसीत-विकसनशिल, महासत्ता-छोटेदेश, जाती-धर्म, उष्णकटिबंधिय-थंडप्रदेश,गोरा-काळा, स्त्री-पुरुष हे सगळे मतभेद बाजुला सारत कोविड-१९ ने जग व्यापले आहे. आरोग्य, प्रशासन, उद्योगच काय शिक्षण आणि राजकारणही या विषाणूच्या तडाख्यातून सुटले नाही. आज ऑनलाईन शिक्षणप्रणाली सुरु झाली आहे. माऊस न धरता येणारा शिक्षकही आपल्या अस्तित्वाच्या लढाईत आयटीचा चॅम्पीयन झाला आहे. गुगल क्लासरुम,आयसीटी, झूम, युट्युब,व्हॉट्सअॅप, टेलिग्राम, मॉकटेस्ट अशी असंख्य साधने वापरून ऑनलाईन शिक्षणप्रणाली सुरु झाली आहे. शिक्षक आणि विद्यार्थी तंत्रस्नेही झाली असतांना 'विद्या वार्षिकांक' इलेक्ट्रॉनिक्स आणि प्रिंट स्वरुपात आपल्या हाती देतांना मला आनंद होतो आहे.

शिक्षणप्रणालीतील अमूलाग्र बदल स्वागतार्ह असतांना मुळात कोरोनानेही जगाला 'धडा' शिकवला आहे. शाश्वतमूल्य बन्धुभाव, समता, नैतिक जबाबदारी आणि गुरुशिष्य नातं शाश्वत आहे. या नात्याला जपत वृध्दींगत करण्यासाठी 'विद्या' मासिकाचे प्रयोजन आहे. विद्यार्थ्यांमध्ये फुलणाऱ्या, फळणाऱ्या साहित्याचे दर्शन व्हावे त्याच सोबत विद्यार्थी आणि शिक्षकांच्या कार्यकर्तृत्वाचा अहवाल सादर करता यावा, त्यातून पुढील वर्षाच्या कार्याची पहाट उगवावी हा उद्देश 'विद्या'प्रकाशनामागचा असतो. राष्ट्रीय छात्र संघ, राष्ट्रीय सेवा योजना, गुणवत्ता यादी, क्रीडा नैपुण्य, ब्रिज कोर्स, पालकमेळावा, स्टाफ अॅकडमी , आजीवन शिक्षक, युवा महोत्सव, स्नेह संमेलन, नेचर क्लब, पालक संपर्क, ग्रंथालय विभाग इत्यादी उपक्रमाचे दर्शन विद्या मधून होत असते.

विद्यार्थी घडला तर राष्ट्र घडेल या उक्तीला अनुसरुन कार्य करणारे मा. संचालक मंडळ, मा.अध्यक्ष, मा. सचिव अहोरात्र कार्यरत असतात. त्यांच्या मार्गदर्शनामुळे आमचे शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी आपल्या कार्यतत्परतेची आणि गुणवत्तेची कसब दाखवत राष्ट्रहितला जपत आहेत. परिक्षेच्या प्रवेशपत्रासोबत दरवर्षी 'विद्या' वार्षिक अंकाची भेट विद्यार्थ्यांसोबत ठरलेली असते. परंतु यावर्षी परीक्षा नाहीत पण गुणपत्रिके सोबत 'विद्या' भेटणारच आणि या संस्कारातून येणाऱ्या परिस्थितीशी , काळाशी, भाविष्याशी खंबीरपणे उभे राहण्याचे बळ मिळणारच. उज्ज्वल भविष्यासाठी सर्व विद्यार्थ्यांना शुभेच्छा!

**प्राचार्य, डॉ.सुभाष गव्हाणे**

संपादक

# * महाविद्यालय विकास परिषद *

**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम (१७) १**

| अ.क्र. | सदस्यांची नांव | पदमान |
|---|---|---|
| १. | **मा. श्री रामकृष्ण गोविंदराव शेटे** | अध्यक्ष, शिक्षण प्रसारक मंडळ, चिखली तथा अध्यक्ष, महाविद्यालय विकास परिषद |
| २. | **मा. श्री प्रेमराज प्रभुलालजी भाला** | सचिव, शिक्षण प्रसारक मंडळ, चिखली तथा सदस्य, महाविद्यालय विकास परिषद |
| ३. | **मा. श्री. ॲड्. विजय गोपालदासजी कोठारी** | कोषाध्यक्ष, शिक्षण प्रसारक मंडळ, चिखली तथा सदस्य, महाविद्यालय विकास परिषद |
| ४. | **मा. श्री. माणिकलाल मदनलालजी लाहोटी** | संचालक, शिक्षण प्रसारक मंडळ, चिखली तथा सदस्य, महाविद्यालय विकास परिषद |
| ५. | **मा. श्री हरिकिसन दौलतरामजी वाधवाणी** | संचालक, शिक्षण प्रसारक मंडळ, चिखली तथा सदस्य, महाविद्यालय विकास परिषद |
| ६. | **मा. श्री. रामदास कल्याणजी निमावत** | संचालक, शिक्षण प्रसारक मंडळ, चिखली तथा सदस्य, महाविद्यालय विकास परिषद |
| ७. | प्रा. डॉ. रमेश पुंडलिक देशमाने | **विभाग प्रमुख प्राचार्य नियुक्त** |
| ८. | प्रा. डॉ.अनिल सत्यनारायण पुरोहित | **शिक्षक प्रतिनिधी** |
| ९. | प्रा. डॉ. सुरेश संतराम माळशिखरे | **शिक्षक प्रतिनिधी** |
| १० | प्रा.डॉ.प्रफुल्ल उत्तमराव गवई | **शिक्षक प्रतिनिधी** |
| ११ | प्रा.डॉ. केदार अनंतराव ठोसर | **समन्वयक आय.क्यु.ए.सी.** |
| १२. | श्री मिलींद केशवराव देशपांडे | **शिक्षकेतर कर्म.प्रतिनिधी** |
| १३. | प्राचार्य, डॉ. सुभाष ज्ञानबा गव्हाणे | **सचिव** |
| | | |

# * महाविद्यालयात कार्यरत शिक्षक व शिक्षकेतर वृंद *

## वरिष्ठ महाविद्यालय विभाग

| क्र. | पूर्ण नांव | | पदनाम |
|---|---|---|---|
| १ | प्रा. डॉ.सुभाष ज्ञानबा गव्हाणे | एम.ए.(सेट),एम.फिल.,बी.एड्.,पीएच.डी | प्राचार्य |
| २ | प्रा. डॉ.सुरेश संतराम माळशिखरे | एम.ए.,बी.एड्., पीएच.डी. | सहाय्यक प्राध्यापक |
| ३ | प्रा. डॉ. केदार अनंत ठोसर | एम.ए.(सेट), पीएच.डी. | सहयोगी प्राध्यापक |
| ४ | प्रा. डॉ. सुभाष ग्यानोजी राऊत | एम.ए.एम.फिल., बी.एड्. पीएच.डी | सहाय्यक प्राध्यापक |
| ५ | प्रा. डॉ.दिलीप पांडुरंग महाजन | एम.ए.,एम.फिल.,बी.पी.एड्.,पीएच.डी. | सहयोगी प्राध्यापक |
| ६ | प्रा. डॉ.प्रफुल्ल उत्तमराव गवई | एम.एम.(नेट),एम.एड्.,पीएच.डी | सहयोगी प्राध्यापक |
| ७ | प्रा. डॉ.रमेश पुंडलिकराव देशमाने | एम.कॉम.,एम.ए. एम.फिल.,बी.एड्. पीएच.डी | सहयोगी प्राध्यापक |
| ८ | प्रा.डॉ.अनिल सत्यनारायण पुरोहित | एम.कॉम.,एम.फिल.,बी.एड्. पीएच.डी | सहयोगी प्राध्यापक |
| ९ | प्रा. डॉ.प्रदीप हिंमतराव बारड | एम.लिब ॲण्ड आय.एस.सी.(सेट),पीएच.डी.,एम.ए. | सहयोगी प्राध्यापक/ग्रंथपाल |
| १० | प्रा. विजय कुंडलिकराव वाकोडे | एम.ए.(सेट,नेट),डि.बी.एम.,बी.एड्.,एम.कॉम(सेट) | सहयोगी प्राध्यापक |
| ११ | प्रा. डॉ.बाळकृष्ण सखाराम इंगळे | एम.कॉम.(सेट),एम.फिल.,जी.डी.सी.ॲन्ड ए.,पी.एचडी.,डी.लिट | सहाय्यक प्राध्यापक |
| १२ | प्रा. सतीश ज्ञानेश्वर मोरे | एम.ए.इंग्रजी (नेट) | सहाय्यक प्राध्यापक |
| १३ | प्रा. उल्हास विजय ब्रम्हे | एम.पी.एड्.(सेट) | शा.शिक्षण संचालक |
| १४ | प्रा.डॉ. नागेश खुशालराव गायकवाड | एम.ए.एम.फिल (नेट) बी.एड्.,पी.एच.डी. | सहाय्यक प्राध्यापक |

## कनिष्ठ महाविद्यालय विभाग

| | | | |
|---|---|---|---|
| १ | प्रा. शैलेंद्र त्र्यंबक जैन | एम.ए.(इंग्रजी,राज्यशास्त्र), बी.एड्. | इंग्रजी,राज्यशास्त्र |
| २ | प्रा. मनीष उमाकांत पालवे | एम.कॉम.,सेट ,बी.एड्.,एम.ए.(अर्थ),जी.डि.सी.ॲन्ड ए. | वाणिज्य,अर्थशास्त्र |
| ३ | प्रा. शरद तुळशिराम रावे | एम.कॉम.,बी.एड्.,एम.ए.(सहकार),जी.डि.सी.ॲन्ड ए. | वाणिज्य,सहकार |
| ४ | प्रा. संतोष काळे | एम.कॉम.,एम.ए. (मराठी,इति.)बी.एड्. | बँकिंग (सी.एच.बी.) |

## शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची सेवाज्येष्ठता यादी

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नांव | शैक्षणिक पात्रता | पदनाम |
|---|---|---|---|
| १ | श्री.मिलिंद केशवराव देशपांडे | बी.ए.,टंकलेखन, MS-CIT | अधिक्षक |
| २ | श्री. जितेंद्र शामराव इंगळे | एम.ए.,टंकलेखन, MS-CIT | मुख्य लिपीक |
| ३ | श्री. संतोष बळीराम राजपूत | एच.एस.सी.,टंकलेखन, MS-CIT | वरिष्ठ लिपीक |
| ४ | श्री. नरेश विनायक सोळंके | बी.ए.,टंकलेखन, MS-CIT | कनिष्ठ लिपीक |
| ५ | कु. सोनाली पंढरीनाथ तुपकर | बी.एस.सी.,बी.ए.,एम.ए.(इंग्रजी) टंकलेखन, MS-CIT | कनिष्ठ लिपीक |
| ६ | श्री. सागर दिनकर गवई | बी.ए.,एटीडी, टंकलेखन,MS-CIT, B.Lib.,M.Lib. & ISC | ग्रंथालय परिचर |
| ७ | श्री. मोहन परशराम शिंगणे | ९वा वर्ग | सेवक |
| ८ | श्री. रतन चंदूलाल काकडे | ६वा वर्ग | सेवक |
| ९ | श्री. राजेंद्र दौलत इंगळे | ६वा वर्ग | चौकीदार |
| १० | श्री. भागवत किसन झगरे | बी.ए.,एम.ए.बी.एड्.,सीलीब, टंकलेखन MS-CIT | सेवक |
| ११ | श्री. सुरेश रामदास कांबळे | बी.ए. | सेवक |

# संघ गंगोत्रीचे भगीरथ :
# लालाजी उपाख्य भगवानदासजी गुप्त




शेतकरी, कष्टकरी आणि ग्रामिण विद्यार्थ्यांच्या सर्वागिण विकासासाठी आपलं महाविद्यालय सुरुवातीपासून कार्यरत आहे. महाविद्यालयातून शिक्षक, प्राध्यापक, वकील, सी.ए.,बँक आणि उद्योग क्षेत्र व्यवस्थापक, शासकीय सेवा जसे महसूल, पोलीस, कृषी आणि अन्य खात्यामध्ये अधिकारी, कर्मचारीच निर्माण झाले असे नाही, तर उत्कृष्ट उद्योजक, व्यापारी आणि प्रगतीशिल आणि प्रयोगशिल शेतकरी आणि राजकीय क्षेत्रात कार्यरत राजकारणीही निर्माण केलेत. सर्वात महत्वाचं कार्य म्हणजे माणुस घडविण्याचं कार्य महाविद्यालयाने केले आहे. महाविद्यालयातल्या तीन किंवा पाच वर्षाच्या संस्कारावर विद्यार्थ्यांचे जीवन घडत असते. शिस्त आणि विनम्रता विवेकशीलतेचा ठसा त्यांच्या दैनंदिन व्यवहारात पडत असतो. हे काही सहज साध्य होत नसते त्यामागे असते प्रेरणा... ती प्रेरणा मुळात शिक्षकात कोठून येते ? शिक्षक ध्येयनिष्ठ व अविरत दुसऱ्याच्या भल्याचा विचार करीत असतात. त्यांच्या अविरत कार्यामुळे हे शक्य होतं. शिक्षक राष्ट्रप्रेमाचे आणि माणुसकीचे धडे तेव्हा गिरवतो जेव्हा त्याच्यापुढे त्यागमूर्ती लोकांची फळी असते. आपल्या महाविद्यालयाची किर्ती आणि मान अशाच शिलेदारामुळे समाजमनात आहे. ते शिलेदार म्हणजे आपले संचालक मंडळ.

शि.प्र.मं. ह्या संस्थेची स्थापना मुळात राष्ट्रीय विचाराने प्रेरित होऊन झाली आहे. पैसा, प्रसिध्दी किंवा राजकीय विस्थापीतांची सोय म्हणून याकडे कोणी पाहिले नाही. आणि तो काळ तसा नव्हताही अत्यंत सात्विक भावनेतून आणि समाजाबद्दलच्या कळवळ्यातून आपले महाविद्यालय उभे राहीले आहे. केवळ ग्रामीण भागातील संस्कारक्षम मुलांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावं म्हणून. सन २०१९-२० या वर्षात याचा उहापोह कश्यासाठी याचा प्रश्न वाचकांना पडला असेल. हे वर्ष महाविद्यालय आणि संस्था उभारणीसाठी प्रसुती वेदना झेलणाऱ्या निवडक शिलेदारांपैकी एक संस्थापक अध्यक्ष कै. भगवानदासीज गुप्त यांच्या जन्मशताब्दीचे वर्ष आहे. विदर्भ प्रांताचे संघचालक, शे-दोनशे एकर जमीन, मोठा व्यापार एवढा व्याप सांभाळत माणूस घडवणारे महाविद्यालय उभे करणारे त्यांचे सर्व सवंगडी, द्रष्टे महापुरुष म्हणून त्यांचा उल्लेख मी ह्या निमित्ताने करील. त्या सर्वांच्या चिंतनातून आपलं महाविद्यालय उभं राहले आहे. त्या सर्वांचा परिचय येणाऱ्या काळात आपणास होईलच.

वै. भगवानदासजी गुप्त यांचे अंचरवाडी परिसरात निवास आणि शेती होती, ते विदर्भ प्रांताचे संघचालकही होते, महाविद्यालय उघडण्याअगोदर आदर्श शाळा रुपाने शि.प्र.मंडळाचे पहिले अपत्य जोमाने कार्याला लागले होते, शाळेच्या निर्मितीपासून स्वयंसेवक शिक्षकांची निवड आणि त्यातून राष्ट्रनिर्मिती असा ध्यास घेतलेली ही सर्व मंडळी शाळेतून स्वयंसेवक आणि कर्तव्यतत्पर विद्यार्थी घडू लागले. गरीबी आणि बेताच्या परिस्थितीमुळे ग्रामीण भागातला विद्यार्थी उच्चशिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून महाविद्यालय उघडण्याची कल्पना पुढे आली. ती त्यांनी अन् त्यांच्या मित्रांनी प्रत्यक्षात उतरवली.

स्व. बाबुरावजी राजे यांनी नागपूर विद्यापीठातून संघ स्वयंसेवकांच्या मदतीने आणि लालाजी यांच्या ओळखीमुळे त्वरीत कामे करुन आणल्याची आठवण मला सांगितली होती. संपूर्ण देशभर व्यापाराच्या निमित्याने प्रवास आणि संघाचे कार्याचा ध्यास वाढवत त्यांनी लोकसंग्रह केला होता. संघ गंगोत्री असो की, जनसंघाचे पदाधिकारी, कार्यकर्तांच्या स्मरणात चरित्रात लालाजींचा उल्लेख प्रकर्षाने दिसून येतो. भाऊसाहेब लहाने यांनी त्यांच्या अनेक आठवणी सांगितल्या आहेत.अमरावती येथील वर्गातून एक विद्यार्थी पळून गेला होता परंतु तो घरी पोहचला नाही. तेव्हा त्याला शोधण्यासाठी एक योजना बनवून संघ कार्यकर्तांच्या प्रयत्नातून चवथ्या दिवशी अकोल्याच्या गांधीग्राममध्ये भटकत असतांना त्याला प्रेमाने अकोला कार्यालयातून यवतमाळ घरी सोडणारे प्रांत संघचालक, अनेक कार्यकर्त्यांना प्रेरणा देणारे ठरलेत. एकदा प्रथमवर्षासाठी जाण्यासाठी जुन्यागावातील चावडीजवळच्या संघकार्यालयाजवळ सर्व स्वयंसेवक जमले होते. एक स्वयंसेवक यायचा बाकी होता. ते उठलेत आणि तडक त्यांच्या खेड्यावरच्या घरी गेलेत. घरी विचारले असता तो आणि त्याचे वडील

कडबा आणायला शेतात गेल्याचे समजले. त्यांनी लगेच विचारले शेत कुठे आहे? गावातले चार दोन पोरं घेऊन जीप शेतात पोहचली, ते दोघ बापलेक कडबा गोळा करीत होते लालाजींनी धोतर खोचले आणि सोबत आणलेल्या पोरांच्या मदतीने कडब्याच्या गाडीवर चढून कडबा भरला, अत्यंत मेहनतीचे आणि कौशल्याचे काम (कडबा कोणालाही रचता येत नाही) त्यांनी काही  मिनिटात करुन धानी (मोठेदोर) बांधून चिखलीत आलेत.

चिखली अर्बन बँकेची स्थापना करुन विदर्भातील पहिली नागरी सहकारी बँक सुरु करण्याचा मान चिखलीला मिळवून दिला चार हजाराच्या भांडवलावर सुरु झालेली बँक आज एक हजार कोटींच्या ठेवी मिळविणारी विश्वासू बँक ठरली. बँकेच्या छोट्या मोठ्या व्यवसायासाठी कर्ज देणाऱ्या धोरणामुळे आज ते छोटे व्यापारीही कोट्याधीश झाले आहे. शेतकरी, शेतमजूर वर्गही बँकेमुळे प्रगतीपथावर राहिला आहे. जन्मशताब्दी वर्षानिमित्त मी त्यांना महाविद्यालयाच्या वतीने अभिवादन करतो.

आपल्या शिक्षण प्रसारक मंडळाच्या आदर्श विद्यालयाच्या चार प्रमुख स्तंभापैकी (संस्थापक शिक्षक) बाबुरावजी राजे उपाख्य त्र्यंबकरावजी देशमुख आणि अण्णासाहेब उपाख्य जनार्दन डांगे यांनाही आदरांजली अर्पण करणे माझे कर्तव्य समजतो. अत्यंत विपरीत परिस्थित ब्राह्मणद्वेष आणि संघ द्वेषाच्या काळात संस्थेत शिक्षक म्हणून काम करणे, विद्यार्थ्यांना ज्ञानाचे धडे देणे, शाळेसाठी पालकांचे मन वळवत इत्यादीसह आपल्या अध्यापनातून छाप उमटवत तट्ट्याची शाळा महालात विराजमान करण्यात याचा सिंहाचा वाटा आहे. शाळेत नोकरी म्हणजे केवळ कुटूंबाचा प्रश्न सुटला असे नाही तर स्वयंसेवक संघासाठी अहोरात्र ध्यास घेऊन सतीच्या वाणाने आयुष्यभर कार्यरत राहणारे शिक्षण समाजमनाला प्रेरणा देऊन गेलेत.

पंतप्रधान पंडित नेहरु सोबत विद्यार्थ्यांची भेट असो की मोठमोठ्या सरकारी उपक्रमांना विद्यार्थ्यांच्या भेटी, वेगवेगळ्या सहली, स्पर्धा याचं आयोजन करुन आदर्श विद्यालयाची मुलं सातासमुद्रापारही गोल्ड मेडल जिंकत गेली आहेत. या सर्वांचे संघ आणि संघाच्या इतर आयामासाठी दिलेले योगदान सर्वांना प्रेरणादायी असं आहे.

यावर्षात इहलोकीची यात्रा संपवून परलोकींच्या अंताच्या प्रवासासाठी निघालेल्या सर्वांच्या प्रती आदरांजली व्यक्त करत आपल्या महाविद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष तथा विदर्भप्रांत संघचालक वै.भगवानदासजी गुप्त यांच्या जन्मशताब्दीनिमित्त महाविद्यालयाचे मा.अध्यक्ष, मा.सचिव सर्व संचालक मंडळ, प्राचार्य आणि विद्यार्थ्यांच्यावतीने अभिवादन करतो.

**–प्रा. डॉ. प्रदीप बारड**
ग्रंथपाल तथा सहयोगी प्राध्यापक
सदस्य: ग्रंथालय आणि माहितीशास्त्र अभ्यासमंडळ
संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

*दिव्यत्वाची जेथ प्रचिती*
*तेथे कर माझे जुळती....*



**वै.त्र्यंबकराव देशमुख**
**उपाख्य बाबुरावजी राजे**

## भावपूर्ण आदरांजली



**वै.प्रा.जनार्दन उपाख्य**
**आण्णासाहेब डांगे**

**प्राचार्य,प्राध्यापक,शिक्षकेतर कर्मचारी**

# बालरोजगार एक समस्या



आज भारताला स्वतंत्र्य मिळून जवळपास ७२ वर्षे लोटली. १५ ऑगस्ट १९४७ ला भारतीय इतिहासातला सुवर्णदिन मानला जातो. या दिवशी भारताची इंग्रजांच्या दिडशे वर्षांच्या गुलामीतून मुक्तता झाली. पण खरचं भारत स्वातंत्र्य झाला असे म्हणणे योग्यं ठरेल काय ? तर अर्थातच नाही. जोपर्यंत भारतातला पत्येक नागरिक स्वातंत्र्याची उपभोग घेणार नाही , स्वतंत्र्य जिवन जगणार नाही तोपर्यंत आपण स्वतंत्र्य झालो असे म्हणणे योग्य ठरणार नाही. आपण पाहतो स्वातंत्र्याच्या ७२ वर्षांनंतरही भारतातील बालकामगारांची , महिलांची , अनाथ – अपंगांची आणि शेतकऱ्यांची स्थिती जैसे तेच आहे. जरी भारत स्वतंत्र झाला असे आपण म्हणंत असलो तरी भारत अद्यापही स्वतंत्र झालेला नाही अस मला वाटतं.

आपण जेव्हा सकाळी घराबाहेर पडतो तेव्हा आपल्याला रत्याने अने ठिकाणी लहान लहान मुले हातात पिशवी घेवून अनवाणी कचरा गोळा करतांना दिसतात. अहो भारत स्वतंत्र होऊन ७२ वर्षे लोटलीत गरीब मुलांच्या पायाला चप्पल नाही यापेक्षा लाजीरवाणी गोष्ट ती कोणती. आपण मोठया अभिमानाने १५ ऑगस्ट , २६ जानेवारीला एकत्र येऊन तिरंग्याला सलामी देतो. राष्ट्रपती व पंतप्रधान यांचे भाषण एकतो. आणि संध्याकाळी जेवून झोपी जातो. पण स्वतंत्र्य म्हणजे काय  याचा विचार कधीच करत नाही. भारताच्या सामाजिक परिस्थीतीचा विचार करत नाही. आणि आपण स्वतंत्र भारतात जगत आहोत असे अभिमानाने सांगतो. हेच का खरे स्वातंत्र्यं.

ज्या मुलाला आयुष्य काय स्वातंत्र्य का गरिबी काय व श्रीमंती काय या संकल्पनाच माहिती नाहीत त्याच्या वाटेला हे दु:ख येतं, ज्या मुलाचं वय खेळण्याचे, बागडण्याच, शिक्षणाचं असत त्या वयात त्यांना आपल्या पोटाची खळगी भरण्याकरिता सकाळीच बाहेर पडावं लागतं कारण त्यांना त्यांच्या दोन वेळच्या जेवनाचा प्रश्न भेडसावतो. त्यांना श्रीमंतांच्या मुलाप्रमाणे कधीच ब्रेकफास्ट , दुध, लंच, डिनर या गोष्टी मिळत नाहीत. खरचं याला स्वतंत्र्य् म्हणावे काय ?

आपले सरकार अशा गरीब मुलांसाठी विविध योजना तयार करते, पण या योजना फक्तं कागदावरच छान वाटतात . प्रत्यक्षात त्या कधीच येत नाही . अशा योजनांना भ्रष्टाचाराची किड लागते. आणि या योजनांसाठी खर्च होणारा पैसा भ्रष्टाचारी मंत्री व भष्टं अधिकाऱ्यांच्या खिशात जातो. त्यांचे हक्क, बालपण शिक्षण आणि जीवन हिरावून घेतात. एवढा तमाशा चालु असतांना देखील त्यावर कोणीही आवाज उठवत नाही. कुणालाही या गोष्टीची जाण नाही. प्रत्येकजण हा आपल्या स्वार्थासाठी जगत आहे. आवाज उठवण्याची गरज सुध्दा कुणालाही वाटतं नाही. लहान मुले पुढे जावून देशाचं भविष्यं घडवणार आहे पण लोकांना भविष्याचाच विसर पडला आहे. सध्या आपल्याला बालपण जपण्याची गरजं आहे. अन्यथा आपलं भविष्यं धोक्यात येणार आहे. सरकारने यासाठी उचित निर्णय घेणे गरजेचे आहे.

जोपर्यंत आपल्या देशाचं बालपण सुरक्षित होणार नाही. तोपर्यंत देश स्वतंत्र झाला म्हणता येणार नाही.

**–पुजा अंबादास हाडे**

बी.कॉम. ३

***



## हिंस्त्र पशु

वाटलेच नाही कधी तीला
दिवस असेही येतील
भारता सारख्या संस्कृत देशात
माते समान, बहीनी समान , मुली समान
स्त्रीवरही नराधम अत्याचार करतील
आई , बहीण , पत्नी, मावशी
सर्व नाते निभावणाऱ्या स्त्रियाच
अत्याचाराच्या बळी ठरतील
नरपराध चिमुकलीलाही चिरडून
टाकलं जाईल
रॉकेल ओतुन तिच्यावर
तीला जिवंत जाळलं जाईल
स्त्री रक्षणाची जबाबदारी उचलणारेच
तीचे प्राण घेतील
अत्याचार करणा-या नराधमाला
शिक्षा न होता
ते खुलेआम घुमतील
वासनेची धुंदी चढलेल्या जगात
त्या कोणावर विश्वास ठेवतील
वाटलेच नाही कधी तिला की इथे
माणसेच हिंस्त्र पशु बनतील

– कल्याणी भोसले
बि.ए. अंत्य वर्ष




गरज नसतांना माझ्या
स्वप्नात येतीस
चांदण्या रात्री दिवस
माझा उजाडून जातीस
आठवण तुझी देऊण सखे
तु कुठे ग गुप्तहोऊन जातीस
तुझे ते स्मित हास्यं पाहून
चंद्र सुध्दा लाजुन जातोस
आणि दिवस उजाडून जातोस
तुझा आवाज कानी पडता सखे
मी झोपेतुन जागा होतो
तुझा तो चेहरा सखे
मला आजही आठवतो
तुझ्या त्या निरागसपणाची
आठवण करूण देतोस
या धावपळीच्या जगात सखे
मी आजही तुलाच शोधत राहतोस
होईल तुझी नी माझी भेट कधीतरी
याच आशेवर मी आज जगत असतोस .

– कल्याणी भोसले
बि.ए. अंत्य वर्ष

या धावपळीच्या जगात सखे
मी आजही तुलाच शोधत राहतोस
होईल तुझी नी माझी भेट कधीतरी
याच आशेवर मी आज जगत असतोस .
– कल्याणी भोसले
बि.ए. अंत्य वर्ष

जिकडे तिकडे प्रेमाच्याच गप्पा सुरु असतात. हाच विषय सर्वांना आवडतो, आज अनेक जण प्रेम करताता परंतु काहींच्या प्रेमाला मध्येच पुर्णविराम लागतो तर काही प्रेम असणारी व्यक्ती मिळाली नाही म्हणून स्वतःच बरंवाईट करुन घेतात. नेमकं खरं प्रेम कस असतं, कुणाला समजायच खरे प्रेम, हेच आपल्याला समजत नाही.  त्यामुळे असे प्रसंग घडतात काही वेळा आपण आकर्षनालाच प्रेम समजु लागतो.

मग नेमकं खरं प्रेम कसं असतं , ते कशाला म्हणायचं खर प्रेम हा प्रश्न तुम्हाला पडला असेल.
समोरच्या व्यक्तीच आपल्यावर प्रेम आहे किंवा नाही याचा विचार न करता किंवा माझं त्याच्यावर किती प्रेम आहे याचीही चर्चा जेव्हा केली जात नाही ते असतं प्रेम. आपल्याला जर आपल्या भावना समोरच्य व्यक्तीला सांगाव्या लागत असतील तर आपलं त्या व्यक्तीवर प्रेम असू शकत नाही. खरं म्हंटले तर त्या भावना त्या व्यक्तीला आपल्या डोळयात दिसल्या पाहिजेत.



# ओळख खऱ्या प्रेमाची

मी तुमच्यासाठी किती केलं आहे, याचा हिशोब जेव्हा ठेवला जात नाही ते असतं खरं प्रेम. ज्या व्यक्तीवर आपलं प्रेम आहे ती व्यक्ती कोणत्याही रुपात समोर आली तरी आपल्या प्रेमात बदल होणार नाही आपलं त्या व्यक्तीवरील प्रेम जे असतं ते कमी होणार नाही हे असतं खरें प्रेम.
समोरची व्यक्ती आपल्याला का आवडते याचं उत्तर जेव्हा आपल्याला देता येत नाही असतं खरं प्रेम. त्या व्यक्तीवर तुम्ही कशासाठी प्रेम करता याच उंत्तर जेव्हा तुमच्याकडे असेल तर तुमचं त्या व्यक्तीवर प्रेम नाही असं समजुन जा. एखादयाचा चेहरा खुप सुंदर आहे म्हणून तुम्ही त्या व्यक्तीवर प्रेम करत असता तर समजा त्या चेहरा कोणत्या कारणाने खराब झाला तर तुमचं प्रेम पण नाहीसे होईल. जिथे काही मिळणार नसेल तरी प्रेम टिकतं ते असतं खरं प्रेम. तु वाटेल ते कर पण तरी माझ तुझ्यावरच प्रेम कमी होणार नाही हे असतं खरं प्रेम.

परंतु आज प्रेमाची व्याख्या बदलली आहे. ज्या व्यक्तीवर आपण प्रेम करतो, त्या व्यक्तीनेही आपल्यावर प्रेम कराव अशी अपेक्ष ठेऊनच आपण प्रेम करत असतो परंतु जेव्हा आपल्या अपेक्षेचा भंग होतो तेव्हा प्रेमाचे स्वरुप दुश्मनीत होते किंवा आत्महतेच्या धमक्या दिल्या जातात. मग याला खरं प्रेम म्हाणता येईल का

काही वेळा आपल्या प्रेमाला आपल्या घरच्यांचा विरोध असतो मग आपण त्याच्या विरुध्द जाऊन लग्न करण्याचा निर्णय घेतो खरं म्हंटले तर आपले आईवडील हे जे काही निर्णय घेत असतात ते आपल्या भल्यासाठीच असतात परंतु त्यांचा निर्णय आपल्याला मान्य नसतो आणि खरं म्हंटले तर या जगात फक्तं आईवडीलच असे असतात ज्यांचं आपल्या मुलांवर निस्वार्थ प्रेम असतं आणि जे आपल्यावर निस्वार्थ प्रेम करतात. मग त्यांचा प्रत्येक निर्णय हा आपल्या सुखासाठी असणार नाही का  परंतु आपण त्यांना विचार सोडून जाण्याचा निर्णय घेतो ज्यांनी आपल्याला जन्म दिला , लहानाचे मोठे केले त्यांनाच सोडून जात असु तर आपल्याला प्रमोचा अर्थच माहित नाही असं समजावं लागेल.

आपण निडलेला जोडीदार हा जर आपल्यासाठी योग्य असेल तर अशा वेळी लोक काय म्हणतील याचा सुध्दा विचार आपले आईवडील हे आपल्या सुखासाठी करणार नाही परंतु त्यासाठी आपल्याला त्यांचा विश्वास संपादन करावा लागेल त्याचे प्रेम समजुन घ्यावं लागेल. जेव्हा आपल्याला त्यांच प्रेम समजेल तेव्हा प्रेम प्रकरणातून विदयार्थ्यांची किंवा विद्यार्थीनीची आत्महत्या अशी बातमी ऐकायला येणार नाही हेच काय तर अनेक वाईट गोष्टी घडणार नाही. आईवडीलांना

सोडून जावं लागणार नाही. आयुष्यात फक्त आपल्याला प्रेमच नाही तर योग्यं जोडीदारही मिळेल व आपलं आयुष्य आपल्याला आणखी सुंदर पध्दतीने जगता येईल.

परंतु यासाठी आपल्याला आपल्या आईवडीलांच्या सल्याची गरज पडेल आणि योग्य सल्ला मिळवण्यासाठी प्रेम त्यांच्यापासून लपवून न ठेवता त्यांना सांगावं लागेल आणि महत्वाचे म्हणज खऱ्या प्रेमचा अर्थ समजून घ्यावा लागेल.

**–केबी**
**बि.ए. अंत्यं वर्ष**

# आई

कोणत्या शब्दात सांगू आहे
मु माझ्यासाी काय आहेस
भुकलेल्या जिवाचा मायेचा घास तु
वेदनेनंतरची पहिली हाक तु
अन् माझा प्रगाढ विश्वास,
हृदयाच्या स्पंदनातील माझा प्रत्येक विश्वास तु
जीवनातील माझ्या सुखाची बाग तु

अधितधी रागात सुर्याची आग तु
अंधारालाही दुर करणारा प्रकाश तु
माझी मायेची धरती आणि छायेची आकाश तु।।

मायेच्या पावसाचा ओलावा तु
जीवनी सुखाचा गारवा तु
आई दुधरूपी अमृताचा गोडवा तु
अन् शेवटच्या क्षणापर्यंतचा कुशीतील विसावा तु।

**– कु.शुभांगी नंदकिशोर गादे**
**११ वी वाणिज्य**



# आयुष्यं

आयुष्य जगणं ही एक कला आहे
हे कसं जगायच हे ज्याच त्यान ठरवायच असतं .
दु:ख सगळयानांच असतात त्याला सामोर जायच
की त्याच्या पिचत जगायचं
हे ज्याच त्यान ठरवायचं असतं
उदयाची चिंता हया सगळयांनाच असतात
पण उदयाची शाश्वती मात्र कोणालाच नसते
मग उदयासाठी मरायचं .
मग उदयासाठी मरायचं
की आजच्या दिवसामध्ये संपुर्ण आयुष्यं जगायचं
हे ज्याच त्यांन ठरवायच असतं

**– किरण मैंद**

# तुला सोडलं

नाही हो म्हणता म्हणता
आपलं ते भेटणं
फोनवर बोलता बोलता
प्रेमात पडणं
स्वप्नं रंगवतांना
माझी तु रोज वाट पहाण
वाटलं होत राहू एका छताखाली
पण काय विपरीत घडलं
तु माझ्यावरचा विश्वास तोडला
म्हणून मी तुला सोडलं
तुझं प्रेम काहीही नव्हतं
तुला फक्त हाताखालचं खेळणं हवं होत
आयुष्यात खुप खुश आहे मी
कारण मी तुला सोडलं
कारण मी तुला सोडलं

**–पुजा गंडे**

# बहीण



भेटली मला मी २०१८ च्या एन एस एस कॅम्प मध्ये
स्पर्शून गेले मनाला तिचे ते भाव साधे
विचारले तिला एक कामे आहेत जिवनात
करशील का पूर्ण ती पवनून माझी बहिण
ती पण हसून बोलली दादा आयुष्यभर तुझ्या सोबत मी
राहीन
नंतर वाटले मनाला बहिणीच्या कमतरतेमुळे जे कुटुंब
होते अपुर्ण
पण भेटली एक बहिण तेही झाले आता पुर्ण
सोबत राहून बहिण्याच्या खुप काही शिकलो
सावरले तिनेच मला जेव्हा पण मी चुकलो
आठवते मला आजही माझे निबंध स्पर्धेतील ते
बक्षिसाचे स्वप्न
रात्रभर जागून तिनेच तर केले होते ते पुर्ण
स्वतं:च्या भावाअगोदर बांधली होती मला तु राखी
तुटले बंधन बहिण भावाचे गोष्टं नव्हती येवढी सोपी
मात्र नंतर कुणीतरी काय करणी केली
गैरसमजुतीमुळे बहिणच माझ्यापासून दूर गेली
समजावू किती मी तिला ताई नव्हता माझा कुठलाच
गुन्हा
तरीपण माफ ककन ताई म्हणण्याचा हक्क देशील का
मला पुन्हा
मनातील वेदना आज लेखनीतून कागदावर उमटल्या
ताई माफ करा मला ताई माफ करा मला  हेच या
कवितेव्दारे पुटपुटल्या


अजय मानकर
बी.कॉम अत्यं




मैत्री म्हणजे काय
तर मैत्री म्हणजे विश्वास, खुल आकाश
अनंत वाहनारा झरा , ज्याचा अंत महीत
नाही असा समुद्रं
मैत्री म्हणजे संकटाच्या वेळीसुध्दा
घट्टं पकडून ठेवनारा हात
मैत्री म्हणजे शिव्या घालून सुध्दा
जिव लावणारी साथ
मैत्री म्हणजे एक बिस्कींटसुध्दा
वाटून खाने
मैत्री म्हणजे संकटात आधारात
हात होणे
मैत्री म्हणजे डोकं ठेवून
रडायला हक्काचा खांदा असणे
मैत्री म्हणजे प्रोत्साहन असणे
मैत्री म्हणजे कधिही न संपनारा व
निस्वार्थ असणारा संबंध होय
शब्दात न मांडता येनारं
अमुल्यं असं नातं म्हणजे
फक्तं आणि फक्त मैत्रीच होय

–कु. शिवानी बबनराव इंगळे

# आई



ऋण तुझ्या उपकाराचे
कसे फेडू आई
तुझ्या वात्सल्याची
कधी होईल का भरपाई
दु:ख सोसुनी अतोनात
सुख आम्हा देई सुख
सुखदुखात तु अमुचे
छत्र बनुनी खंबीरपणे
पाठीशी उभी राही
दु:ख पिऊनी स्वत: तू
आम्हा मात्र अमृताचा
देऊ
पंखाखाली घेऊनी आम्हां
घास मुखी भरवायची
लहानाचे मोठे होऊनी
आम्ही तिच्याकडेच
पाठ का ग फिरवायची
वृध्द पण येताच तुज
नाते हे हरवायचे
परके तुझ करुनी आम्ही मात्र नवे नाते
शोधायचे
जेव्हा आम्हा ठोकर लागली
आईचे नाते आठवायचे
एरवी मात्र वृध्द आईची
लाज आम्हा वाटायची , लाज आम्हा
वाटायची

– कु. संजिवनी रतन काळे

# आयुष्य

काही स्वप्न ही अर्धीच राहतात
तर काही आठवणी फक्त हाती उरतात
नांव असतं आयुष्य याचं
मोजकीच मंडळी या प्रवासात उत्तीर्ण होतात
मि एक दुवा याच प्रवासाचा
सारं काही विसरुनी आलो
समोर दिसताच मोठी प्रश्न
कारं पान मात्र तेव्हा सांडुनी आलो

बारा अंकी घड्याळ असते
मिनिटाचे भविष्य सेकंदावर ठरते
पळत राहतो आपण तेव्हा स्वप्नांच्या मागे
कळतच नाही तेव्हा नशीबाचे हे पान आपल्याच
हाती असते.

थांबतात मग सारि स्वप्न
दिशा कोणतीच उरत नाही
वळणा–वळणाच्या या प्रवासाला
पूर्ण विराम मात्र तेव्हा मिळत नाही.

लिहीलच नशिब ते होणारच आहे
आहो उगवलेला सूर्य शेवटी मावळणारच आहे
जवळी सारे असूनी सुध्दा का आपण दुर पळतो
असुनी प्रवास हा दोन दिसांचा का अजुनी आपण
जिंकुन पुन्हा हरतो.

– विशाल परिहार
बी.कॉम. तृतीय




टिच भर पोटासाठी
माझी आई राब राब राबायची
नाही मिळाल खायालाातर
उपाशी पोटी निजायची
जिव माझा इवलासा
आई माघगे रडायचो
 भाकरीच्या तुकड्यासाठी
वन वन फिरायचो वन वन फिरायचो.....
व्याकुळलेल्या मनास माझ्या
आई मायेचा हात फिरवायची
मिळेल ते खायला देऊनी
शांत असे निजवायची
मायेची ती ममता वेगळी
अथांग ती करुणेचा सागर
मी तिचा तान्हुला
तिच माझा आधा
टिचभर पोटासाठी
राब राब राबायच
दरवेशा सारखं इथून तिथ फिरायच
मिळेल जे कष्ट करुन
आनंदून जायच
वात्सल्याची ती देवी
तीच माझी दैवत
तीच आहे आधार माझा
आणि तिच माझी दौलत
टिचभर पोटासाठी

– कु.अंकिता विजय जाधव
बी.ए. द्वितीय



## आठवण मैत्रीणिची

हरवलेले हे दिवस येतील का पुन्हा
जागलो आज आणि उदया हाच दिवस जुना
नशिबाने एकदा पुन्हा कुठेतरी भेटू
आठवणिला एकदा एकत्र मिळून वेचु
पुन्हा तेव्हा सर्व काही बदलले असेल
कोनीतरी बोलवतेय म्हणुन भेट लवकर सुटेल
लांब पर्यंत चालणाऱ्या गप्पा गोष्टी राहणार नाही
आठनिचा झरा मग त्या दिशेने वाहणार नाही
आज सोबत आहोत वाटेल तसे जगून घ्या
जिवनभर पुरतील अशा आठवणी जपुण घ्या

– परविन नवरंगी
बि.ए. अंत्यंवर्ष

# मराठी वाङ्मय मंडळ

भाषा हे संवादाच माध्यम आह. भाषेद्वारे मानवी संवेदना व्यक्त करता येतात. यात समाजाचे प्रतिबिंब साहित्य उमटम असते. त्या भाषेचे संवर्धन व्हावे भाषा ही आपली मातृभाषा आहे. ती जोपासल्या गेली पाहीजे. यासाठी दरवर्षी प्रमाणे ‘मराठी भाषा अभ्यास मंडळाची स्थापना सत्र २०१९–२० मध्ये करण्यात आली. त्या माध्यमातून विविध उपक्रम राबविण्यात आले.

१) दि. १० जुलै १९. रोजी डॉ.सुभाष गव्हाणे, प्राचार्य तथा मराठी विभाग प्रमुख यांच्या अध्यक्षतेखाली विद्यार्थ्यानमधून खालील प्रतिनिधीची निवड करण्यात आली. तर मराठी भाषा अभ्यास मंडळाचे समन्वयक म्हणून डॉ.प्रफुल्ल गवई काम पाहतील असे ठरविण्यात आले.

२)उद्घाटन समारंभ :

दि. १६ ऑगस्ट १९ रोजी मराठी भाषा अभ्यास मंडळाचे उद्घाटन संपन्न झाले. उद्घाटक म्हणून डॉ. गणेश मालटे, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ मराठी अभ्यास मंडळ सदस्य तर अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. सुभाष गव्हाणे तर विचार मंचावर समन्वयक डॉ. प्रफुल्ल गवई व मराठी भाषा अभ्यास मंडळाच्या अध्यक्षा कु. कल्याणी भोसले उपस्थित होते. याप्रसंगी पुजा आडे हीने सुत्रसंचालन केले. यावेळी मंडळाची घोषणा करण्यात आली.

३) लेखक आपल्या भेटीला :

दि. १३ जानेवारी २०२० रोजी अभ्यासमंडळाच्या आयोजित कार्यक्रमात लेखक, समिक्षक, कवी श्री रविंद्र सावळे यांनी विद्यार्थ्यांना भेट दिली. साहित्यनिर्मिती करतांना काय काळजी याबाबत विद्यार्थ्यांन सोबत संवाद साधला. या कार्यक्रमाला प्राचार्य डॉ. सुभाष गव्हाणे उपस्थित होते. या प्रसंगी डॉ. प्रफुल्ल गवई यांनी समिक्षक मा.रविंद्र साळवे यांचा सत्कार केला.

४) मराठी भाषा गौरव दिन :

दि. २७ फेब्रुवारी २०२०रोजी मराठी भाषा गौरव दिला हा कार्यक्रम संपन्न झाला. या प्रसंगी लेखक, कवी कादंबरीकार श्री मिलिंद जाधव यांचे व्याख्यान संपन्न झाले. यात मराठी भाषेचा गुणगौरव लिखाणातून होण हे कसं करजेचे असते. भाषा ही व्यावसयिक व्हावी असे मार्गदर्शन त्यांनी केले. याप्रसंगी रंगमंचावर प्राचार्य डॉ. सुभाष गव्हाणे उपस्थित होते तर सुत्रसंचालन प्रा. विजय वाकोडे यांनी केले.

मराठी अभ्यास मंडळ कार्यकारीणी

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | कु. कल्याणी भोसले | – बी.ए.३ |
| कार्याध्यक्ष | श्री निलेश जाधव | – बी.कॉम.३ |
| उपाध्यक्ष | श्री आकाश साळवे | – बी.ए.३ |
| उपाध्यक्ष | कु. अनुष्का दाभाडकर | – बी.कॉम. २ |
| सचिव | कु. अंकिता जाधव | – बी.ए.२ |
| सहसचिव | श्री आनंद पछेरवाल | – बी.ए.१ |
| कोषाध्यक्ष | कु. परविन नवरंगी | – बी.ए.३ |
| सदस्य | कु. शिवानी कर्वा | – बी. कॉम.२ |
| | कु. प्रिया हिवाळे | – बी.ए.३ |
| | कु. जया देशमुख | – बी.कॉम.२ |
| | कु..कविता जाधव | – बी.ए.१ |
| | कु. कविता खानझोडे | – बी.ए.२ |
| | कु.शिवानी इंगळे | – बी.ए.२ |
| | श्री सचिन गंडे | – बी.ए.१ |
| | कु.चंचल वानखडे | –बी.ए.१ |
| | कु. जयश्री गोफणे | –बी.ए.२ |

**प्रा.डॉ.प्रफुल्ल गवई**
मराठी विभाग

# English Literary Forum






English language is the window to the world Considering the same as very important the FLF means English Literary forum made same additional and emerges as English language and literary Forum instead. The Goble recognition of English language brings to the notice of its essential and crucial nature to be introduce various arenas in consonance with the present scenario. The skill of English language and literature make a beeline for the new & bright future for the students studying in college and Universities. Only the need is that students should seize the day even in this globalized context because there is always room at the top and that would be available when someone focuses on English studies. A wee bit anyone can start to develop his of her skills and for that genuine task we, the forum organized a lecture (talk) cum workshop on "Communication and Interview Skills." by Dr. S.I. Jukkalkar of Shri Shivaji College ,Chikhli .He meticulously wrapped everybody's head around the topic and the result is that the student paid their kind attention to his interlocutor. He striked exactly the right note with the importance of English language for inculcating this zeal and zenith in the college premise the forum is bound to form its executive committee and the composition of it is as follows:

| | | | |
|---|---|---|---|
| 1] | Ms. Kavita Shivaji Khanzode | President | B.A.II |
| 2] | Ms. Pragati Gajanan Tak | Secretary | B.Com.II |
| 3] | Mr. Nilesh Raju Patil | Joint -Secretary | B.A. II |
| 4] | Ms. Ankita Vijay Jadhao | Treasurer | B.A.II |

The executive council was on its way to imbibe the English lanaguage and literary study culture throughout the year. In this way the forum was on its toes to offer any help concering to the English study and gaining its knowledge.

**-Prof. S.D.Morey**
Incharge
English Literary Forum

# अर्थशास्त्र विभाग (नियोजन मंडळ )







आधुनिक जागतिकिकरण, उदात्तिकरण व खाजगीकरणाच्या माहीती तंत्रज्ञानच्या २१ व्या ‘शतकाला समोर जातांना गळेकापू स्पर्धेम अर्थशास्त्राचे अनन्यसाधारण महत्व आहे. अर्थशास्त्राचा विद्यार्थी सक्षम करण्याच्या दृष्टीने महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागाअंतर्गत नियोजन मंडळाची स्थापना, व्याख्याने, विद्यार्थी कार्यशाळा, चर्चासत्रे, अर्थज्ञान स्पर्धा परिक्षा इ. कार्यक्रमाचे आयोजन दरवर्षी नियमितपणे करण्यात येत असते.

दि.११ जुलै २०१९ रोजी ‘जागतिक लोकसंख्या दिन’ निमित्त अर्थशास्त्र विभागामार्फत नियोजन मंडळांतर्गत महाविद्यालयाचे मा.प्राचार्य डॉ.सुभाष गव्हाणे यांच्या अध्यक्षतेखाली प्रा.दिलीप पां. महाजन अर्थशास्त्र विभाग व नियोजन मंडळाचे प्रमुख यांच्या मार्गदर्शांतर्गत कु. शिवानी कारवा हीने भारतातील लोकसंख्या वाढीची कारणे, कु. शाहीन नंदावाले हिने लोकसंख्या वाढीचे परिणाम कु. शिवानी शिंगणे हिने लोकसंख्या नियंत्रणात आणण्यासाठीच्या उपायावर भर दिला. कार्यक्रमाचे अध्यक्ष मा.प्राचार्य डॉ.सुभाष गव्हाणे यांनी लोकसंख्येत युवकांच्या सहभागावर भर देत त्यासाठी उपाय करण्याचे उद्‌बोधन केले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा.विजय वाकोडे तर आभार प्रदर्शन डॉ.सुभाष राऊत यांनी केले.

दि. १९ सप्टेंबर २०१९ रोजी नियोजन मंडळाचे गठण करण्यात आले त्यात पुढील प्रमाणे कार्यकारीणीची घोषणा करण्यात आली.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | अध्यक्ष | पवन सोमठाणे | बी.कॉम. ३ |
| २) | उपाध्यक्ष | कु. अपूर्वा विजय जाधव | बी.ए.३ |
| ३) | सचिव | कू.प्रगती गजानन टाक | बी.कॉम.२ |
| ४) | सहसचिव | कु.शिवानी बबनराव इंगळे | बी.ए.२ |
| ५) | कोषाध्यक्ष | विठ्ठल निमकाळे | बी.कॉम.२ |
| ६) | सहकोषाध्यक्ष | कु. अंकिता विजय जाधव | बी.ए.२ |
| ७) | सदस्य | कु.शुभांगी गजानन जाधव | बी.कॉम.३ |
| ८) | सदस्य | कु. अनुष्का दाभाडकर | बी.कॉम.२ |
| ९) | सदस्य | कु. शाहीन नंदावाले | बी.कॉम.२ |
| १०) | सदस्य | योगेश परसने | बी.कॉम.२ |
| ११) | सदस्य | कु.परविन नौरंगी | बी.ए.३ |
| १२) | सदस्य | रोहीत जाधव | बी.ए.२ |
| १३) | सदस्य | मंगेश काळे | बी.कॉम.१ |
| १४) | सदस्य | कु.राधा गातोडे | बी.कॉम.१ |
| १५) | सदस्य | कु.साक्षी गायकवाड | बी.कॉ.१ |
| १६) | सदस्य | शुभम सपकाळ | बी.ए.१ |

वरील प्रमाणे नियोजन मंडळाचे गठण करुन कार्यकारीची घोषणा प्रा. दिलीप पां. महाजन अर्थशास्त्र विभाग व नियोजन मंडळ, प्रमुख यांच्याद्वारे कार्यकारीणीची घोषणाकरण्यात आली.

दि. ३० सप्टेंबर २०१९ रोजी बी.ए.३ च्या विद्यार्थ्यांच्या सेमिनारचे आयोजन करण्यात आले यात कु. अपूर्वा जाधव हीने भारतीय अर्थव्यवस्थेची वैशिष्ट्ये तर अमोल लोखंडे याने नियोजनाचे प्रकार व तंत्र विषद केले. कु. परविन नौरंगी ने खाजगीकरण उदारीकरण व जागतिकीकरणाचे फायदे स्पष्ट केले तर प्रविण जाधव याने खाजगीकरण उदारीकरण व जागतिकीकरणाचे तोटे विषद केले. या चर्चा सत्रात एकूण ०४ विद्यार्थ्यानी सहभाग घेतला.

दि.०४ ऑक्टोबर २०१९ रोजी बी.ए.३ च्या विद्यार्थ्यांचे 'भारतीय शेतीची उत्पादकता कमी असण्याची कारणे व उपाय योजना' या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात येऊन यात कु. परविन नवरंगी ने शेती लागवडीची पध्दती अतिरिक्त लोक संख्या व सामाजिक प्रतिकूल वातावरण तर प्रविण किशोर जाधव याने तुकडी करण व उपखंडन, सिंचन पाणी पुरवठ्याच्या अपूऱ्या सोईवर भर दिला तर कू. अपूर्वा जाधव हीने शेतमालाला रास्त भाव नाही, भांडवलाचा शेतीला अपूरा पूरवठा केला जातो तर विपणनातील अडचणी यांचा परामर्श घेतला तर अमोल लोखंडे याने नियंत्रीत बाजारपेठा, गोदाम व्यवस्था, मालाची श्रेणी व प्रतवारी नियंत्रण, प्रमाणीत वजन मापे इ. उपाय योजनांवर भर दिला. या चर्चासत्रात एकूण ०४ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

दि.१० ऑक्टोबर २०१९ रोजी बी.ए.२ च्या विद्यार्थ्यांच्या सेमिनारचे आयोजन करण्यात आले यात कु. शिवानी इंगळे हीने स्थुल अर्थशास्त्राच्या मर्यादा कु. अंकिता जाधव हीने स्थूल अर्थशास्त्राची व्याप्ती, कू. भावना वानखेडे हीने स्थूल अर्थशास्त्राचे प्रकार, कु. साक्षी महाजन हीने स्थूल अर्थशास्त्राचे महत्व तर कु. कविता खानझोडे हिने राष्ट्रीय उत्पन्न मापनातील अडचणी स्पष्ट केल्या या चर्चासत्रात एकूण ०५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

दि.१६ ऑक्टोबर २०१९ रोजी बी.ए.१ च्या विद्यार्थ्यांच्या चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले यात अयान रायलीवालेयाने आर्थिक नियमांची वैशिष्ट्ये, कु. जयश्री गोफणे हीने मार्शल व रॉबिन्सच्या अर्थशास्त्राच्या व्याख्या कु. भाग्यश्री देशमाने हिने आर्थिक नियमांची वैशिष्ट्ये, कु .अंकिता चेडे हीने आर्थिक व भौतिक नियमातील फरक, कु. कविता जाधव हीने मार्शल व रॉबिन्सच्या अर्थशास्त्राच्या व्याख्यांची वैशिष्ट्ये तर कु. श्रध्दा बोरकर हीने रॉबिन्सच्या अर्थशास्त्राच्या व्याख्येची वैशिष्टये व कु. किर्ती डब्बे हीने मार्शलच्या व्याख्येची वैशिष्ट्ये मोहन बीडकर याने रॉबिन्सच्या अर्थशास्त्राच्या व्याख्येची वैशिष्ट्ये कृष्णा मुंडलीक ह्याने सुक्ष्म अर्थशास्त्र म्हणजे काय तर आनंद पचेरवाल ह्याने मार्शलच्या अर्थशास्त्राच्या व्याख्येतील दोष तर शुभम वाघ याने आर्थिक नियमांची वैशिष्ट्ये स्पष्ट केली. यात एकूण ११ विद्यार्थ्यांनी भाग घेतला.

दि.१९ ऑक्टोबर २०१९ रोजी बी.ए.१ च्या विद्यार्थ्यांच्या चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. या कु. भाग्यश्री देशमाने हीने बाह्य  बचती व एकाधिकाराची वैशिष्ट्ये कु. अंकिता चेडे हीने अंतर्गत बचती व मूल्यविभेदाचे प्रकार, कु. कविता जाधव हीने मागणीचा नियम व बर्हिगत अबचती कु. श्रध्दा बोरकर हीने भूमी व एकाधिकाराची वैशिष्ट्ये स्पष्ट केली. कू. किर्ती डब्बे हीने अंतर्गत बचती व एकाधिकारयुक्त बाजाराची वैशिष्ट्ये, अयान रायलीवाले ह्याने मागणीची लवचिकता व पूर्ण स्पर्धेचा वैशिष्ट्ये, कु. जयश्री गोफणे हीने किंमत लवचिकतेचे प्रकार व अंतर्गत बचती तर शंतनु कुडके ह्याने भूमिची व एकाधिकाराची वैशिष्ट्ये, कु. चंचल वानखेडे हीने मागणीची लवचिकता उत्पादन खर्चाचे प्रकार व रिकॉर्डाचा खंड सिध्दांत मोहन बिडकरने पूर्ण स्पर्धेची वैशिष्ट्ये व रिकार्डोचा खंड सिध्दान्त तर कृष्णा मुंडलीकने भूमी व एकाधिकार युक्त स्पर्धेची वशिष्ट्ये, कु . गायत्री सिरसाट हीने पूर्णस्पर्धेची व भूमिची वैशिष्ट्ये स्पष्ट केली. सचिन गंडे ह्याने आऱ्हासी सिमान्त उपयोगिता सिध्दांत व अंतर्गत अबचती तर शुभम वाघ ह्याने एकाधिकाराची प्रकार स्पष्ट केले. या चर्चा सत्रात एकूण १४ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

दि. २३ ऑक्टोबर २०१९ रोजी बी.ए.२ च्या विद्यार्थ्यांच्या सेमिनारचे आयोजन करण्यात आले. यात कु शिवानी इंगळे हीने स्फीतीची कारणे व उपभोग प्रवृत्तीवर परिणाम/ प्रभाव टाकणारे घटक स्पष्ट केले, तर रोहीत जाधव ह्याने फिशरचा मुद्रा परिणाम सिध्दांत अपस्फीतीची कारणे व अंतर्गत व विदेशी व्यापारातील फरक तर कु. अंकिता जाधव हिने वस्तूविनिमयाचे गुण तर कु. भावना वानखेडे हीने स्फुतीचे प्रकार तर कु. कविता खानझोडे हीने अपस्फितीचे परिणाम व कु. साक्षी महाजन हीने सिमान्त उपयोग प्रवृत्तीची वैशिष्ट्ये स्पष्ट केलीत. या चर्चा सत्रात एकूण ०६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

दि.२९ जानेवारी २०२० रोजी प्रा.डॉ. दिलीप पां. महाजन अर्थशास्त्र विभाग व नियोजन मंडळ प्रमुख यांच्या अध्यक्षतेखाली 'भारतीय  अर्थव्यवस्थे समोरिल आव्हाने' या विषयावर प्रा.डॉ.राजेंद्र  एन. बोरसे भगवान बाबा महाविद्यालय, लोणार व प्रा.डॉ.संजय एम.दांदडे एम.ई.एस.महाविद्यालय मेहकर यांची व्याख्याने आयोजित करण्यात आली. त्यांनी विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा. विजय वाकोडे यांनी केले.






दि. २९ फेब्रुवारी २०२० रोजी शनिवारला प्रा.डॉ.सुरेश सं. माळशिखरे यांच्या अध्यक्षतेखाली 'जलसाक्षरता व संवर्धन काळाची गरज' या विषयावर प्रा.डॉ.महादेव रिठे जिल्हास्तरीय जलनायक राजे छत्रपती कला महाविद्यालय धामणगांव बढे यांचे व्याख्यान संपन्न झाले. विदर्भ अर्थशास्त्र परिषदेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त अर्थशास्त्र नियोजन मंडळांतर्गत या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. प्रास्ताविक व प्रमुख अतिथींचा परिचय नियोजन मंडळ व अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ. दिलीप पां. महाजन यांनी केले. कार्यक्रमाचे सुत्र संचालन कु. अनुष्का दाभाडकर व कुणाल मंजुळकर तर आभार प्रदर्शन कु. वैशाली मेहेत्रे हीने केले. मंचावर प्रा. विजय वाकोडे तर यशस्वीतेसाठी कु. पल्लवी भराड, प्रशांत जाधव, डॉ. देशमाने, डॉ. इंगळे, प्रा मोरे, डॉ. राऊत, डॉ.गायकवाड यांचे सहकार्य लाभले.

दि.०३ मार्च २०२० रोजी बी.ए.३ च्या विद्यार्थ्यांचे सेमिनारचे आयोजन करण्यात आले. यात 'भारतीय लोकसंख्या ' या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. यात अमोल लोखंडे यांने लोकसंख्येचे स्थलांतराचे प्रकार विषद केले तर कु. परविन नौरंगी हीने लोकसंख्या वाढीची कारणे तर कु. अपूर्वा जाधव हीने लोकसंख्या वाढीचे परिणाम तर प्रविण जाधव ह्याने लोकसंख्या नियंत्रणार्थ उपाय योजनाचा परामर्श घेतला या चर्चासत्रात एकूण ०४ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

दि. ०५ मार्च २०२० रोजी बी.ए.१ च्या विद्यार्थ्यांच्या 'महाराष्ट्राची अर्थव्यवस्था' या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. यात कु. अंकिता चेडे हीने महाराष्ट्राच्या लोकसंख्येची वैशिष्ट्ये, कु. किर्ती डब्बे हीने महाराष्ट्रातील नागरीकरण कु. कविता जाधव हीने महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेची वैशिष्ट्ये, कु. श्रध्दा बोरकर हीने ग्रामीण लोकसंख्येचे स्थलांतर तर कु. गायत्री सिरसाट हीने कृषीचे महत्व तर कु. चंचल वानखेडे हीने हरितक्रांतीचे परिणाम व कु. भाग्यश्री देशमाने हीने कृषीची उत्पादकता वाढविण्यासाठी उपाय योजना कु .जयश्री गोफणे हीने सिंचनाची साधने यावर भर दिला या चर्चासत्रात एकूण ०८ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

दि. १२ मार्च २०२० रोजी बी.ए. ०२ च्या 'भारतीय अधिकोष प्रणाली' या विषयावर विद्यार्थ्यांच्या चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. या कु. शिवानी इंगळे हीने अधिकोषाचे प्रकार, कु. साक्षी महाजन हीने अधिकोषाची कार्ये, कु. अंकिता जाधव हीने अधिकोषाची प्रत्यनिर्मिती, रोहीत जाधव ह्याने प्रत्यय निर्मितीच्या मर्यादा तर कु. कविता खानझोडे हीने मध्यवर्ती अधिकोषाची कार्य कु. भावना वानखेडे हीने प्रत्ययनियंत्राची साधने तर निलेश पाटीलने सहकारी बँकेची कार्ये सविस्तर स्पष्ट केली. या चर्चासत्रात एकूण ०७ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

**प्रा.विजय वाकोडे**
प्रमुख
व्यावसायिक अर्थशास्त्र

**प्रा.डॉ. दिलीप पांडुरंग महाजन**
प्रमुख
नियोजन मंडळ व अर्थशास्त्र विभाग

# इतिहास अभ्यास मंडळ




**दि.१०/९/२०१९ रोजी इतिहास अभ्यास मंडळ अंतर्गत महाविद्यालयात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना प्रा.डॉ.नितीन राऊत**

२०१९–२० चा इतिहास अभ्यास मंडळाचा अहवाल खालील प्रमाणे आहे. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये इतिहास विषयाची आवड निर्माण व्हावी व खरा इतिहास समाजापुढे आणण्याच्या उद्देशाने दरवर्षी इतिहास अभ्यास मंडळाचे गठन करण्यात येते.

दि.०३/०९/२०१९ रोजी इतिहास अभ्यास मंडळाची कार्यकारीणी गठीत करण्यात आली. इतिहास अभ्यासमंडळाचे प्रभारी प्रा.डॉ.सुरेश संतराम माळशिखरे यांन इतिहास विषय असणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांच्या समक्ष सत्र २०१९–२० ची इतिहास अभ्यास मंडळाची कार्यकारीणी घोषीत करण्यात आली. इतिहास अभ्यास मंडळाची कार्यकारीणी खालीलप्रमाणे –

| अ.क्र. | विद्यार्थी प्रतिनिधीचं नांव | वर्ग | पद |
|---|---|---|---|
| ०१ | कु. कल्याणी रमेश भोसले | बी.ए.३ | अध्यक्ष |
| ०२ | रोहित भुपेंद्र जाधव | बी.ए.२ | उपाध्यक्ष |
| ०३ | कु. शिवानी बबनराव इंगळे | बी.ए.२ | सचिव |
| ०४ | आकाश प्रकाश साळवे | बी.ए. ३ | सहसचिव |
| ०५ | सुनिल किसन जाधव | बी.ए.२ | कोषाध्यक्ष |
| ०६ | कु. संजीवनी रमन काळे | बी.ए.२ | सदस्य |
| ०७ | कु.परविन अय्युब नवरंगी | बी.ए.३ | सदस्य |
| ०८ | कु. कविता सदाशिव जाधव | बी.ए. १ | सदस्य |
| ०९ | कु.निकिता श्रीकृष्ण गायकवाड | बी.ए.१ | सदस्य |
| १० | कु. अपुर्वा विजय जाधव | बी.ए.३ | सदस्य |
| ११ | प्रविण किशोर जाधव | बी.ए.३ | सदस्य |

वरील पदाधिकाऱ्यांची निवड सर्वानुमते करण्यात आली.

१) सप्टेंबर २०१९– दि.०३–०९–२०१९ रोजी इतिहास अभ्यासमंळाची कार्यकारिणी गठीत करण्यात आली. इतिहास अभ्यास मंडळची अध्यक्षा कु. कल्याणी रमेश भोसले बी.ए.३ हिची निवड करण्यात आली.

२) माहे सप्टेंबर २०१९ – दि. २३–०९–२०१९ रोजी हरप्पा संस्कृती या विषयावर बी.ए.१ च्या विद्यार्थ्यांकरीता चर्चासत्र घेण्यात आले. यावेळी २२ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

३) माहे ऑक्टोबर २०१९– दि.०९–१०–२०१९ रोजी बी.ए.२ च्या विद्यार्थ्यांकरिता मोगलवंश या विषयावर चर्चासत्र घेण्यात आले.

यावेळी ११ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

४) माहे डिसेंबर २०१९– दि.२७–१०–२०१९ रोजी बी.ए.३ च्या विद्यार्थ्यांकरीता राजकिय परिषदा (इ.स. १९३९–१९४५) या विषयावर चर्चासत्र घेण्यात आले. यावेळी १० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंविला.

५) माहे जानेवारी २०२० – दि. १०–०१–२०२० रोजी बी.ए.२ च्या विद्यार्थ्यांकरीता १८५७ चा उठाव या विषयावर चर्चासत्र घेण्यात आले. यावेळी ०९ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

६) माहे फेब्रुवारी २०२० – दि.१०–०२–२०२० रोजी इतिहास अभ्यास मंडळाअंतर्गत व्याख्यान आयोजित करण्यात आले. प्रमुख वक्ते अभिनव अध्यापक महाविद्यालय, चिखली येथील प्रा.डॉ. नितीन मिसाळ यांनी बुलडाणा जिल्हा यातील ऐतिहासिक मंदिराची माहिती या विषयावर विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कु. संजिवनी रतन काळे बी.ए.२ हिने केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व परिचय प्रा. डॉ. सुरेश माळशिखरे यांनी केले तर आभार प्रदर्श इतिहास अभ्यास मंडळाच्या अध्यक्षा कु कल्याणी रमेश भोसले बी.ए.२ हिने केले. यावेळी बी.ए.१,२.३ या वर्षातील ४० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

७)माहे फेब्रुवारी २०२०– दिनांक १७–०२–२०२० रोजी इतिहास अभ्यासमंडळाअंतर्गत ऐतिहासिक सहलीचे आयोजन करण्यात आले होते. राजूर गणपती, भद्रामारोती, वेरुळ व दौलताबाद इ. ऐतिहासिक स्थळांना भेटी देण्यात आल्या यावेळी २० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

**– प्रा.डॉ.सु.सं. माळशिखरे**
इतिहास विभाग प्रमुख

# राज्यशास्त्र अभ्यास मंडळ




महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना राजकिय घडामोडीसोबतच राजकिय संकल्पनांची जाणीव व्हावी व राज्यातील राजकीय प्रक्रीयेत त्यांचा सक्रीय सहभाग वाढावा आणि त्यातूनच उद्याचे नेतृत्व तयार व्हावे या उद्देशाने दरवर्षीप्रमाणे यावर्षीसुध्दा राज्यशास्त्र अभ्यासमंडळाचे गठण करण्यात आले. अभ्यासमंडळाद्वारे राबविलेले उपक्रम पुढीलप्रमाणे आहेत.

* अभ्यासमंडळ गठण (दि.१४ सप्टेंबर २०१९)

राज्यशास्त्र विषयाच्यासर्व विद्यार्थ्यांना एकत्र करुन लोकशाही पध्दतीने अभ्यामंडळाचे गठन करण्यात आले. सुरुवातीला प्रा.डॉ.नागेश नायकवाडयांनी राज्यशास्त्र अभ्यास मंडळाची भूमिका व लोकशाही पध्दतीने करावयाची भूमिका विषद केली. त्यानंतर सर्वानुमते राज्यशास्त्र अभ्यासमंडळ पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. निवड झालेल्या सर्व पदाधिकाऱ्यांची गुलाबपुष्प देऊन अभिनंदन करण्यात आले. शेवटी राज्यशास्त्र अभ्यासमंडळ नवनियुक्त अध्यक्ष प्रविण किशोर जाधव याने मनोगत व्यक्त केले व आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

* राज्यशास्त्र अभ्यासमंडळ (२०१९-२०) पदाधिकारी

| | | | |
|---|---|---|---|
| १) | प्रविण किशोर जाधव | अध्यक्ष | - बी.ए.भाग ३ |
| २) | रोहित भूपेंद्र जाधव | उपाध्यक्ष | - बी.ए.भाग २ |
| ३) | आकारश प्रकाश साळवे | सचिव | - बी.ए.भाग ३ |
| ४) | कु. कल्याणी रमेश भोसले | सदस्य | - बी.ए. भाग ३ |
| ५) | कु.प्रिया जगन्नाथ हिवाळे | सदस्य | - बी.ए. भाग ३ |
| ६) | कु.शिवानी बबन इंगळे | सदस्य | - बी.ए. भाग २ |
| ७) | कु. अंकिता विजय जाधव | सदस्य | - बी.ए. भाग २ |
| ८) | कु. कविता शिवाजी खानझोडे | सदस्य | - बी.ए. भाग २ |
| ९) | कु. चंचल अनिल वानखेडे | सदस्य | - बी.ए. भाग १ |
| १०) | अमोल तुळशिराम बकाल | सदस्य | - बी.ए. भाग १ |
| ११) | कु.श्रध्दा गजानन बोरकर | सदस्य | - बी.ए. भाग १ |

✻ राज्यशास्त्रात सुवर्णपदक प्राप्त कु. नंदिनी यंगडचा सत्कार (दि.२१ डिसेंबर २०१९)

राज्यशास्त्र विषयात, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातून सर्वाधिक गुण प(ाप्त करुन प्रथम येण्याचा बहुमान कु. नंदिनी यंग हिने (उन्हाळी २०१९) मध्ये मिळविला आहे. त्याबद्दल तिला विद्यापीठाच्या दि.२० डिसेंबर २०१९ रोज पार पडलेल्या दिक्षांत समारंभामध्ये मा. केंद्रिय मनुष्यबळ विकास राज्यमंत्री श्री संजयजी धोत्रे यांच्या हस्ते सुवर्णपदक प्राप्त झाले त्याबद्दल महाविद्यालयाने तिचा दुसऱ्यादिवशी मा. श्री.प्रेमराजजी भाला (सचिव, शि.प्र.मं.चिखली) यांच्या हस्ते सत्कार आयोजित केला होता. याप्रसंगी मा.श्री.रामदासजी निमावत(संचालक शि.प्र.मं.चिखली) महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष गव्हाणे उपस्थित होते. कु. नंदिनी यंगड हिने आपण महाविद्यालयातील शिस्त व शिक्षकांच्या योग्य मार्गदर्शनामुळेच सुवर्णपदक प्राप्त करु शकल्याची कबुली देवून विद्यार्थ्यांना अभ्यास्याने काही अशक्य नाही असे ठासून सांगितले. तसेच प्रमुख अतिथींनी विद्यार्थीनीचे कौतुक करुन विद्यार्थ्यांना असेच यश संपादन करण्यासाठी शुभेच्छा दिली.

या कार्यक्रमाचे यशस्वी नियोजन व आयोजन प्रा.डॉ. नागेश गायकवाड यांनी केले होते.

✻सामान्य ज्ञान स्पर्धा ( दि. २ मार्च २०२०)

राज्यशास्त्र संशोधन व अध्ययन मंच बुलडाणाद्वारा दरवर्षी जिल्हास्तरीय सामान्य ज्ञान स्पर्धा आयोजित केली जाते ती आपल्या महाविद्यालयात सुध्दा घेतली जाते यावर्षी ती दि. २ मार्च २०२० रोजी घेण्यात आली या स्पर्धेमध्ये ७० मुलांनी सहभाग घेतला होता. त्यातुन पवनदीप घोलप हा प्रथम आला तर द्वितीय कु. प्रगती टाक व योगेश परसने हे आले. यानंतर प्रा.विजय वाकोडे यांनी सामान्य ज्ञान स्पर्धेतील सहभागी विद्यार्थ्यांना विविध प्रश्नांच्या शंका निरसनासह मार्गदर्शन केले.

✻ चर्चासत्र ( दि. १४ मार्च २०२०)

कला शाखेच्या सर्व विद्यार्थ्यांना एकत्र करुन सध्या भारतात केंद्र सरकार द्वारा नागरिकत्व दुरुस्ती कायदा नुकताच लागु करण्यात आला. त्यासंदर्भात अनेक संघटना नेत्यांद्वारे त्यावर समर्थन अथवा विरोध केला जात आहे. त्या पार्श्वभूमिवर आम्ही या विषयाची निवड केली. या चर्चा सत्रामध्ये रोहींद्र भुपेद्र जाधव, प्रविण किशोर जाधव, कु. कविता खानझोडे व कु. कल्याणी भोसले आदी विद्यार्थ्यांनी आपले मते मांडली आणि शेवटी प्रा.डॉ. नागेश गायकवाड यांनी विद्यार्थ्यांच्या उनेक प्रश्नाचे उत्तरे देऊन विद्यार्थ्यांचे नागरीकत्व दुरुस्ती कायद्याबद्दल गैरसमज व शंकाचे निरसन करुन मार्गदर्शन केले.

अशाप्रकारे यावर्षी सत्र २०१९-२० मध्ये वरील उपक्रमाचे आयोजन केले होते.

**- प्रा.डॉ.नागेश खु.गायकवाड**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख

# वाणिज्य व संगणक अभ्यास मंडळ

आजच्या माहिती व तंत्रज्ञानाच्या युगात संगणकाला फार महत्वाचे स्थान आहे. आज इंटरनेट, नेटवर्क , ब्राऊझर, सर्च इंजिन , इमेल आणि वेबसाईट यांचा वापर आज सर्वच क्षेत्रात केला जातो. त्यामूळे वाणिज्य शाखेमध्ये संगणक विषयांचा समावेश करण्यात आला आहे. साहजिकच विद्यार्थ्यांना समाजामध्ये वावरतांना त्याचा फायदा होत आहे. तसेच आज फार मोठ्या प्रमाणात औद्योगिक क्रांती झाली आहे. त्यामुळे व्यवसाय व उद्योगधंद्यामध्ये फार मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. ह्याचा फङ्मायदा वाणिज्य शाखेचे विद्यार्थी घेत असतात. त्यामुळे वाणिज्य शाखेला फार महत्वाचे स्थान आहे. वाणिज्य शाखेचे विद्यार्थी अष्टपैलु होण्यासाठी वाणिज्य शाखेअंतर्गत विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. यामध्ये तंज्ञोचे व्याख्यान, कार्यशाळा, शैक्षणिक व औद्योगीक सहलींचे आयोजन, बँक प्रशिक्षण इत्यादी कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव व माहिती दिली जाते. यातूनच विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास साधण्याचा प्रयत्न केला जातो. त्यामुळेच दरवर्षी वाणिज्य व संगणक मंडळाची स्थापना महाविद्यालयात करण्यात येते.

**१)मंडळ गठण :**

दि.१२/१०/२०१९ ला वाणिज्य शाखेच्या सर्व विद्यार्थ्यांची सभा बोलविण्यात आली. त्यामध्ये खालील कार्यकारीणी निश्चित करण्यात आली.

| अ.क्र. | विद्यार्थी प्रतिनिधीचे नांव | वर्ग | पद |
|---|---|---|---|
| १ | कु. शुभांगी जाधव | अंतिम वर्ष वाणिज्य | अध्यक्ष |
| २ | नकूल भास्कर ठेंग | द्वितीय वर्ष वाणिज्य | उपाध्यक्ष |
| ३ | कु.पुजा नाके | अंतिमवर्ष वाणिज्य | सचिव |
| ४ | कु. शिवानी करवा | द्वितीय वर्ष वाणिज्य | सहसचिव |
| ५ | अजय गोविंदराव मानकर | वाणिज्य अंतिमवर्ष | कोषाध्यक्ष |
| ६ | योगेश परसणे | द्वितीय वर्ष वाणिज्य | प्रसिध्दी प्रमुख |
| ७ | कु.अनुष्का दाभाडकर | द्वितीय वर्ष वाणिज्य | सदस्य |
| ८ | विठ्ठल निकाळजे | द्वितीय वर्ष वाणिज्य | सदस्य |
| ९ | ऋषिकेश जाधव | द्वितीय वर्ष वाणिज्य | सदस्य |
| १० | कु.सायली मनोज श्रीवास्तव | प्रथम वर्ष वाणिज्य | सदस्य |
| ११ | कु.नम्रता अरविंद कुळकर्णी | प्रथम वर्ष वाणिज्य | सदस्य |
| १२ | आकाश काशिनाथदेवकर | प्रथम वर्ष वाणिज्य | सदस्य |

**२) वस्तु व सेवाकर कार्यक्रम :**

दिनांक २२/२/२०२० वस्तु व सेवाकर ह्या विषयांवर मार्गदर्शन कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून व्यंकटेश कला व वाणिज्य महाविद्यालया, देऊळगांव राजा येथील प्रा. डॉ.बन्सीले होते. हा एक अप्रत्यक्ष  कर आहे. या अगोदर अनेक प्रकारचे कर आकारले जात होते. ते सर्व नाहिशे करुन एकच वस्तु व सेवा कर हा कायदा भारतीय पंतप्रान माननीय नरेंद्र मोदी यांनी १ जुलै २०१७ रोजी भारतामध्ये कार्यान्वीत केला. ह्या करामुळे कररचनेत सुसूत्रता निर्माण झाला.' एक देश एक कर' ही संकल्पना उदयास आली. वस्तु व सेवा कराचे फायदे ह्या विषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

**३)ऑनलाईन वस्तु खरेदी –विक्रीचे फायदे तोटे :**

दिनांक १४ मार्च २०२० रोजी ऑनलाईन वस्तु खरेदी–विक्रीचे फङ्मायदे आणि तोटे या विषयावर मार्गदर्शन कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमासाठी शिवाजी महाविद्यालयाचे प्रा.सुरेश गवई हे प्रमुख मार्गदर्शक होते .त्यांनी आपल्या मार्गदर्शनात ऑनलाईन व्यवहाराचे फायदे आणि तोटे यावर सखोल असे मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यानी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे




दिल.

**४) चर्चासत्रे :**

प्रथम वर्ष वाणिज्यच्या विद्यार्थ्यांसाठी ऑपरेटिंग सिस्टिम, एस.एस.वर्ड आणि एम.एस.पॉवरपॉईंटह्या विषयावर चर्चासत्रे आयोजित केली. द्रितीय वर्ष वाणिज्यच्या विद्यार्थ्यांसाठी, माहिती माहितीतंत्रज्ञान, टेली या विषयावर चर्चासत्रे आयोजित केली. अंतिम वर्ष वाणिज्यच्या विद्यार्थ्यांसाठी ब्राऊझर, सर्च इंजिन, एम.एस. फ्रंटपेज या विषयावर चर्चासत्रे आयोजित केली.



## कु.नेहा शिंदे तिसरी मेरीट

कु. नेहा तारेश शिंदे ह्या विद्यार्थीनीने अमरावती विद्यापीठाने घेतलेल्या मार्च २०१९ वाणिज्य शाखेच्या परिक्षेमध्ये १८०० पैकी १४९६ गुण मिळवून तिसरी मेरीट आणली आहे. तसेच ह्या विद्याथीनीला विद्यापीठाद्वारे देण्यात येणारी श्री राधेश्याम गणेडीवाल रु. ३०००/– चे रोख पारितोषीक प्राप्त झाले आहे. तिच्या या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे. तिच्या ह्या यशाबद्दल शि.प्र.मं.चे मा.अध्यक्ष श्री रामकृष्णदादा शेटे, मा.सचिव श्री प्रेमराजजी भाला, मा.संचालक मंडळ, मा.प्राचार्य डॉ.सुभाष गव्हाणे, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ.रमेश देशमाने, सर्व प्राध्यापक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी ह्यांन अभिनंदन केले.

**डॉ. बाळकृष्ण इंगळे**
सदस्य

**प्रा. डॉ. अनिल पुरोहीत**
सदस्य

**प्रा. डॉ. रमेश देशमाने**
वाणिज्य विभागप्रमुख व समन्वयक

# ग्रंथालय व माहितीशास्त्र विभाग




ग्रंथालय हे प्रत्येक संस्थेच्या हृदयस्थानी असते. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या ज्ञानाच्या कक्षा अधिक विकसीत व्हाव्यात या उद्देशाने अभ्यासक्रमाच्या माहिती बरोबर इतरही ज्ञानशाखाची माहिती विद्यार्थ्यांना व्हावी यासाठी ग्रंथ संग्रह बरोबर इंटरनेटच्या माध्यमातून दृकश्राव्य साहित्य पाहण्याची सुविधा ग्रंथालयात उपलब्ध आहे. दररोज विद्यार्थी त्याचा लाभ घेत आहेत. ग्रंथाच वाचन अलिकडे कमी झाले असे निर्दशनास येत असलं तरी प्रासंगिक आणि वृत्तपत्राचे आणि नियतकालीकांचे वाचनात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. ग्रंथालयात ३९ नियतकालीके व २६५६८ ग्रंथ उपलब्ध आहेत. मार्च २०१९ पासून श्री शिवाजी महाविद्याय, चिखलीशी सामंजस्य करार करुन तेथील ग्रंथालयाच्या सुविधेचाही विद्यार्थी लाभ घेऊ शकतात.

ग्रंथालयात सन २०१०–११ पासून संगणीकरण करण्यात आले असून संगणकीकरणासाठी विद्यापीठ अनूदान आयोगाच्या इन्फर्मेशन लायब्ररी नेटवर्क गांधीनगर, गुजरात ने विकसीत केलेल्या सॉफ्टवेअर फॉर युनिव्हसिटी लायब्ररीचा वापर करण्यात आला आहे. यामुळे ग्रंथ आरक्षण,ग्रंथदेवघेव, ग्रंथशोध,ग्रंथवर्गीकरण आणि तालीकीकरण सोपे झाले आहे. ग्रंथालयात इलेक्ट्रानिक्स ग्रंथालयाच्या सेवा देण्याच्या दृष्टी भारत सरकार मानव संसधान विभागाच्या युजीसी इंफोनेट डिजिटल लायब्ररी कर्न्सेटीयमच्या नॅशनल लायब्ररी ॲन्ड इन्फोर्मेशन सर्व्हिस इन्फ्रास्ट्रक्चर फॉर स्कॉलर कटेनच्या द्वारे ई–ग्रंथालय ऑक्टोबर २०१४ पासून सुरु करण्यात आले असून त्याव्दारे ६३२०+ ई संशोधन पत्रिका आणि १ कोटीपेक्षा जास्त ग्रंथ उपलब्ध झाले आहेत. त्याचा वापर २४×७ रिमोट ॲक्सेस मिळत आहे.

ग्रंथालयात विविध उपक्रम राबवले जातात. नविन विद्यार्थ्यांसाठी ग्रंथालय परिचय कार्यक्रम घेण्यात येतो. दरवर्षी वाचकप्रेरणादिन साजरा करण्यात येतो, ग्रंथ प्रदर्शनी, पोस्टर प्रदर्शनी, ग्रंथालय महर्षी डॉ. एस.आर.रंगनाथन यांचा जन्मदिन, नोकरी विषयक जाहिरातीचे प्रदर्शन, प्रतीरुप लेखन सेवा याच बरोबर स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, संदर्भ सेवा, कात्रण सेवा ही देण्यात येते. दरवर्षी उत्कृष्ट ग्रंथ पुरस्कार देण्यात येत असतो. यावर्षी हिंमतराव यशवंतराव बारड स्मृती उत्कृष्ट वाचक पुरस्कार मंगेश उत्तम काटे यांना तर कौशल्याबाई तुकाराम सुरडकर स्मृती उत्कृष्ट वाचक पुरस्कार कु.पुजा अंबादास हाडे यांना प्रदान करण्यात आला

ग्रंथालयाची स्वतंत्र वेबसाईट असून www.spmtmchikhli.web.com याशिवाय ग्रंथालयाचा ब्लॉग www.spmgranthalay.blogspot.in सुरु आहे.

**प्रा.डॉ.प्रदीप हिम्मतराव बारड**
ग्रंथपाल तथा सहयोगी प्राध्यापक
सदस्य, अभ्यास मंडळ संत गाडगेबाबा अमरावती विद्यावीठ, अमरावती

# शारीरिक शिक्षण विभाग




**वरिष्ठ महाविद्यालय**

शैक्षणिक वर्ष २०१९–२० मध्ये वरिष्ठ महाविद्यालयातील एकून २५ विद्यार्थी/विद्यार्थीनींनी क्रॉसकंट्री, अॅथलेटिक्स, कबड्डी, बॉलबॅडमिंटन अशा विविध आंतर महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धांमध्ये सहभाग नोंदविला. तर महाविद्यालयाच्या बॉलबॅडमिंटन संघाने (मुले) विद्यापीठ स्तरावर तृतीय क्रमांक प्राप्त केला.

महाविद्यालयाची खेळाडू कु. रुचिका दिलीप मेहेत्रे बी.ए.द्वितीय हिने दि. ७ जानेवारी २०२० ते १० जानेवारी २०२० या कालावधीत आंध्र विद्यापीठ विशाखापट्टनम येथे आयोजित अखिल भारतीय आंतर विद्यापीठ बॉलबॅडमिंटन स्पर्धेत संत गाडगेबाबा अंमरावती विद्यापीठाचे प्रतिनिधीत्व करुन कलर कोट प्राप्त केला. तसेच संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ बॉलबॅडमिंटन संघाची कर्णधारपद भूषविले.

महाविद्यालयाचा खेळाडू स्वप्नील काशिनाथ सुरडकर बी.ए.प्रथम  याने मंगलोर विद्यापीठ, मंगलगंगोत्री येथे दि.२९ जानेवारी २०२०ते १ फेब्रुवारी २०२० या कालावधीत आयोजित अखिल भारतीय आंतर विद्यापीठ बॉलबॅडमिंटन स्पर्धेत संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे प्रतिनिधीत्व करुन कलर कोट प्राप्त केला.

आयोजन :

**१) २९ ऑगस्ट : राष्ट्रीय क्रीडा दिन**

दिनांक २९ ऑगस्ट २०२० रोजी मेजर ध्यानचंद यांचे जयंतीचे औचित्य साधून महाविद्यालयात राष्ट्रीय क्रिडा दिन साजरा करण्यात आला. मेजर ध्यानचंद यांचे प्रतिमेस माल्यार्पण करण्यात आले. तसेच मेजर ध्यानचंद यांचे कार्यकर्तृत्वाबद्दल विद्यार्थ्यांचे उद्‌बोधन करण्यात आले.

दि. २९ ऑगस्ट रोजी फिट इंडिया मुव्हमेंट अंतर्गत १०००० हजार पावले रोज चालण्याचे फायदे विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले तसेच प्राचार्य सर्व प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांनी महाविद्यालयील क्रीडांगणात १०००० पावले चालून पूर्ण केलीत.

याच दिवशी महाविद्यालयात बॉलबॅडमिंटनच्या आंतर वर्गीय स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.






दि. ८ मार्च २०२० रोजी महिला दिनानिमित्त महाविद्यालयाची खेळाडू कु. ऋचिका दिलीप मेहेत्रे बी.ए.द्वितीय हिच्याकडे पोलिस स्टेशन चिखलीचा ठाणेदार पदाचा १ दिवसाचा कार्यभार सोपविण्यात आला होता.

**२) आंतरवर्गीय क्रीडा स्पर्धा आयोजन :**

दि.२० जानेवारी ते २३ जानेवारी २०२० या कालावधीत स्नेहसंमेलना अंतर्गत क्रीकेट, कबड्डी, लगोरी(फक्त मुलींसाठी) चे आंतर वर्गीय सामने आयोजित करण्यात आले.

## कनिष्ठ महाविद्यालय विभाग

कनिष्ठ महाविद्यालयाच्या बॉलबॅडमिंटन संघाने (मुली) आंतर शालेया विभाग स्तर स्पर्धेत बुलडाणा जिल्ह्याचे प्रतिनिधीत्व केले. या संघात कु. कोमल भुसारी, कु. श्रध्दा गवई, कु. निकिता गवई, कु. प्रिया बनचरे, कु. प्रतिक्षा परिहार या खेळाडूंचा समावेश होता.

तसेच कु. प्रिया राजु बनचरे हिने आंतर शालेय विभागस्तर कराटे स्पर्धेत बुलडाणा जिल्ह्याचे प्रतिनिधीत्व केले.

**– उल्हास ब्रम्हे**

शारीरिक शिक्षण संचालक

# राष्ट्रीय सेवा योजना नियमित कार्यक्रम

(१ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२०)

सत्र  २०१९–२० यावर्षेभरात मा.प्रा.डॉ.एस.जी.राऊत व प्रा. विजय वाकोडे राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी म्हणून जबाबदारी पार पाडली. अनेक वर्षांपासून महाविद्यालयात सुरु असलेल्या २०० स्वयंसेवकांच्या युनिटची जबाबदारी व्यवस्थित पार पाडण्यासाठी विद्यापीठाने घालून दिलेले नियम आणि अपेक्षित उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून वर्षाच्या सुरुवातीलाच वर्षभराचे नियोजन केले गेले. त्यातून स्वयंसेवक हा चारित्र्यवान, स्वावलंबी व सामाजिक बांधिलकी जोपासून संत गाडगेबाबा यांच्या जीवन कार्याचा खऱ्या अर्थाने वाहन व्हावा या दृष्टीने सर्व कार्यक्रमांचे स्वरुप होते. यशस्वीरित्या वर्षभरात राबविलेल्या कार्यक्रमांचा आढावा पुढिल प्रमाणे आहे.

**१.  दि. ५ एप्रिल २०१९ :–**

रोजी डॉ.हेडगेवार रुग्णालय, चिखली येथे जावून महाविद्यालयातील ६५ विद्यार्थ्यांचे रक्त तपासणी करुन त्यांचा रक्तगट आणि एच.बी.चे प्रमाण तपासून घेण्यात आले.

**२.  दि. २१ जुन २०१९ – योगा दिवस :–**

'आंतरराष्ट्रीय योगदिवस' चिखली जिल्हा परिषदेच्या भव्य मैदानावर आयोजित करण्यात आला होता. त्यात महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक सहभागी झाले होते.

**३.  दि. २६ जून २०१९ – सामाजिक न्याय दिन :–**

छत्रपती शाहु महाराज यांच्या जयंतीनिमित्य महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने सामाजिक न्याय दिन साजरा करण्यात आला.

**४.  दि. १  जुलै २०१९ –  वृक्षारोपण :–**

वृक्षारोपण दिनानिमित्त महाविद्यालयात संस्थेचे सचिव मा. प्रेमराजजी भाला यांच्या हस्ते महाविद्यालयात वृक्षारोपण करण्यात आले.

**५.  दि. २६  जुलै २०१९ –**

२६ रोजी केंद्र शासन व विद्यापीठाच्या निर्देशाप्रमाणे अंजली टॉकीज येथे १५० स्वयंसेवकांना नेवून सर्जिकल स्ट्राईकवर आधारित सिनेमा 'उरी' दाखविण्यात आला.

**६.  दि. १० ऑगस्ट  २०१९ –  उद्‌बोधन वर्ग  :–**

राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.एस.जी.राऊत यांनी नविन प्रवेशित विद्यार्थ्यांना राष्ट्रीय सेवा योजना काय आहे हे समजण्यासाठी त्यांचा उद्‌बोधन वर्ग घेण्यात आला.

**७.  दि. १४  ऑगस्ट  २०१९ –  स्वच्छता अभियान  :–**

स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर स्वयंसेवकांकडून १६ ऑगस्ट रोजी महाविद्यालयीन परिसरात स्वच्छता अभियान घेण्यात आले.

**८.  दि.१५ ऑगस्ट २०१९ –  सेल्फी पॉईंटचे उद्‌घाटन    :–**

स्वातंत्र्यदिनाच्या दिवशी मा. नारायणरावजी राजपूत व मा. नानासाहेब बाहेकर यांच्या हस्ते राष्ट्रीय सेवा योजनेच्या सेल्फी पॉईंटचे उद्‌घाटन करण्यात आले. सेल्फी पॉईंटवर राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रमांचे छायाचित्र व गाडगेबाबांच्या फोटो सोबत त्यांची दशसूत्री लावण्यात आली होती.

**९.  दि. १६ ऑगस्ट २०१९ – अंधश्रध्दा निर्मूलन कार्यक्रम  :–**

बुलडाण्याचे डॉ. गजानन देशमुख आणि सौ.स्वाती सावजी यांनी विज्ञानाचे प्रयोग करुन दाखवून अंधश्रध्दा निर्मूलन

होईल अशा पध्दतीने त्यांच्या व्याख्यानातून विद्यार्थ्यांना उद्बोधन केले.

**१०. दि. २० ऑगस्ट २०१९ – एडस् जागृती कार्यक्रम :–**

चिखली ग्रामीण रुग्णालय, चिखली येथे सौ.भावना कॅम्बेल आणि श्री गवळी यांनी एडस् रोगाची भयानकता समजून सांगितल आणि कोणत्या प्रकारे काळजी घ्यावी याविषयी विद्यार्थ्यांशी चर्चा केली.

**११. दि.२२ ऑगस्ट – पुरग्रस्तांसाठी मदत रॅली**

यावर्षी महाराष्ट्रभर पुरस्थिती निर्माण होऊन अनेक गावे पुराच्या पाण्याने व्यापली गेली. त्यांना थोडिफार आर्थिक मदत व्हावी यासाठी स्वयंसेवकांनी गावात रॅली काढून लोकांकडून मदत जमा करुन पुरग्रस्तांना ८२५०/– रु. पाठविली.

**१२. दि. ८ सप्टेंबर – आंतरराष्ट्रीय साक्षरता दिवस**

९ सप्टेंबर २०१९ रोजी आंतरराष्ट्रीय साक्षरता दिवसानिमित्त डॉ.नागेश गायकवाड, क्षेत्रीय समन्वयक यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

**१३. दि. २३ सप्टेंबर २०१९ – स्वच्छता अभियान रॅली व नाटीका**

स्वच्छता अभियान प्रभावीपणे लोकांपर्यंत पोहचविण्यासाठी गावा रॅली काढून मुख्य रस्त्यावर विद्यार्थ्यांनी नाटीका सादर केल्या.

**१४. दि. २४ सप्टेंबर २०१९ – राष्ट्रीय सेवा योजना दिन**

राष्ट्रीय सेवा योजनेला स्थापनेला पन्नास वर्ष पूर्ण झाले त्यानिमित्ताने विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ.पी.यु.गवई व क्षेत्रीय समन्वयक डॉ. एन.के.गायकवाड यांनी स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले.

**१५. दि. २६ सप्टेंबर २०१९ – युवा संसद प्रतियोगिता**

नेहरु युवा केंद्र, बुलडाणा यांच्या संयुक्त विद्यमाने तालुका स्तरीय वादविवाद स्पर्धा ठेवण्यात आली होती.

**१६. दि.२ ऑक्टोबर २०१९ – महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री जयंती**

राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने म.गांधी व लालबहादूर शास्त्र यांची एकत्र जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी डॉ. एन.के.गायकवाड यांनी त्यांच्या जीवनावर प्रकाश टाकला.

**१७. दि. २६ नोव्हेंबर २०१९ – संविधान दिन :–**

श्री शिवाजी महाविद्यालयाचे प्रा.डॉ.जी.टी.आंभोरे हे प्रमुख वक्ते म्हणून बोलाविले होते. त्यांनी संविधान विषयीचे मुलभूत अधिकार कर्तव्य आणि त्यानिमित्त महत्वाच्या फलकांवर अभ्यासपूर्ण विवेचन केले.

**१८. दि. ६ डिसेंबर २०१९ – महापरिनिर्वाण दिन :–**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनी त्यांना विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून व गितांमधून अभिवादन केले.

**१९. एडस् दिन :**

दि. १डिसेंबर ला साजरा होणारा एडस् दिन दि.१३ डिसेंबर २०१९ रोजी आयोजित करुन ग्रामिण रुणालया, चिखली येथील सौ.भावना कॅम्बेल आणि त्यांचे सहकारी श्री गवळी यांनी विद्यार्थ्यांची रक्ताचे नमुने घेवून एडस् चाचणी केली.

**२०. दि.20 डिसेंबर २०१९ – संत गाडगेबाबा पूण्यतिथी :–**

संत गाडगेबाबा यांच्या पूर्णतिथी निमित्त पथनाट्य करुन व त्यांना अभिवादन करण्यात आले.

**२१. दि. ८ ते १५ जानेवारी २०२० – विशेष श्रम संस्कार शिबीर**

श्री गुरुदेव आश्रम पळसखेड सपकाळ येथे आठदिवसीय विशेष श्रम संस्कार शिबिराचे आयोजन केले गेले त्यात विशेष प्रकल्पाअंतर्गत बंधाऱ्याचे खोलीकरण व सेवा संकल्प येथे नैसर्गिक सौंदर्यांसाठी माती खोदकाम करुन मातीचा ओटा तयार करण्यात आला. दोन्ही गावांचे एकत्रीत भव्य रक्त तपासणी व आरोग्य शिबिर घेण्यात आले त्यातील रक्तगट तपासणी २) एच.बी. ३) सी.बी.सी. ४) थायरॉईड चाचण्या करण्यात आल्या शिबीरादरम्यान स्वच्छता जनजागृती रॅली, स्वच्छता अभियान, उन्नत भारत अभियान, अंधश्रध्दा निर्मुलन प्रबोधन, संत गाडगेबाबा यांच्या विचारांचा प्रसार–प्रचार, बेटी बचाव–बेटी पढाओ' त्याच

बरोबर बौद्धीक सत्रात जीवनत आरोग्याचे महत्व, कृषी क्षेत्राततील करिअरच्या संधी, निस्वार्थ सेवाभाव आनंदी जीवनाची गुरुकिल्ली, पंचायत राज आणि महिलेचा सहभाग, नागरिकत्व सुधारणा कायदा–समज/गैरसमज, ग्रंथालय आणि सामाजिक विकास, वैज्ञानिक दृष्टीकोन, महापुरुषांचे विचार काळाची गरज, ट्राफिक नियमांची आवश्यक व महत्व, उन्नत भारत अभियानसंकल्ना व व्याप्ती इत्यादी प्रकारचे विषय ठेवण्यात आले होते.

**२२. १८ जानेवारी २०२० :–**

विद्यापीठाच्या आदेशानुसार मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आले होते. त्यात स्वयंसेवक व इतर सर्व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

**२३. दि. २८ जानेवारी २०२० – ऑनलाईन एडस् जागृती कार्यक्रम :–**

ग्रामीण रुग्णालय, चिखली यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात 'रेड रिबन क्लब'ची स्थापना करुन एडस् जागृतीसाठी महाराष्ट्र शासनाची ऑनलाईन जागृती कार्यक्रम विद्यार्थ्यांना दाखविण्यात आला.

**२४. दि. २४ फेब्रुवारी २०२० – संत गाडगेबाबा जयंती :–**

संत गाडगेबाबा यांची महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने जयंती साजरी करुन त्यांच्या विचारांना अभिवादन करण्यात आले.

**२५.दि.७ मार्च २०२० :–**

महिला दिनानिमित्त महाविद्यालयात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. त्यात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

वरिल प्रमाणे सत्र २०१९–२० या वर्षात कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. त्यात मा.प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी या सर्वांचे सहकार्य लाभले.

**२६.दि.१० एप्रिल २०२०:–**

राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून कोरोना राष्ट्रीय संकटाच्या पार्श्वभूमीवर राज्याबाहेरील झोपडीमध्ये वास्तव्यास असलेल्या वैदू व इतर लोकांच्या ६७ कुटूंबियांना अन्नधान्य व सॅनिटायझरचे वितरण करण्यात आले.


**२७.दि.२ मे २०२० :–**

द्रतकग्राम पळसखेड सपकाळ येथे कोरोनाच्या पार्श्वभूमीवर गाव फवारणीसाठी रुपये २,०००/– ची मदत करण्यात आली.

**प्रा. डॉ. एस. जी. राऊत**
रा.से.यो. समन्वयक

**प्रा. व्हि.के. वाकोडे**
रा.से.यो. समन्वयक

# एन.सी.सी. विभाग





महाविद्यालयीन जीवनात शिस्त व कार्याप्रती आदर भाव तत्परता अंगीकारावी यासाठी एनसीसी मार्फत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले जाते. देशाप्रती कर्तव्य,जबाबदारी आणि आदर हा नवयुवकांमध्ये कसा रुजवला जाईल याचे प्रयत्न हे या एनसीसीद्वारे केल्या जातात व त्यासाठीच महाविद्यालयाचे एनसीसी युनिट कार्यरत असते.

शैक्षणिक सत्र २०१९-२० मध्ये महाविद्यालयाच्या एनसीसी युनिटमध्ये एकूण १०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. यापैकी प्रथम वर्षात एस.डी.-४५, एस डब्ल्यू-११, द्वितीय एस डी-०४ असे एकूण १०० विद्यार्थी सहभागी होते वर्षभरात एकूण सात कॅम्प हे १३ महाराष्ट्र बटालियन तर्फे आयोजित करण्यात आले होते. त्यामध्ये बी व सी सर्टिफिकेट च्या विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला होता या सात कॅम्प पैकी ०६ ते १३ ऑक्टोबर २०१९ ला कूमाऊ (केरळ) येथे आयोजित करण्यात आला होता. या कॅम्पमध्ये महाविद्यालयाच्या एनसीसी युनिटचा सीनियर अंडर ऑफिसर योगेश गजानन मुळे व कॅडेट गोविंदा सुरेश वाळेकर हे सहभागी झाले होते, तर दुसरा कॅम्प हा २७ नोव्हेंबर २०१९ ते ४ डिसेंबर २०१९ या कालावधीत राजपिपला (गुजरात) येथे आयोजित करण्यात आला होता. या कॅम्पमध्ये कॅडेट निवृत्ती सखाराम कोथळकर याने आपला सहभाग नोंदविला होता.

१३ महाराष्ट्र बटालियन खामगांव यांच्या निर्देशाप्रमाणे यावर्षी महाविद्यालयाच्या एनसीसी युनिटने बरेच उपक्रम राबविले आहेत जसे २६ जुलै २०१९ ला कारगिल विजय दिवस साजरा करण्यात आला. ११ ऑगस्ट २०१९ ला जन आरोग्य शिबिरात एनसीसीच्या विद्यार्थ्यांनी स्वच्छता व सुरक्षा याची फार मोठी जबाबदारी पार पाडली. २२ ऑगस्ट २०१९ ला कोल्हापूर येथे झालेल्या पूर परिस्थितीमुळे पुरग्रस्तांना रॅली काढून निधी जमा करण्यासाठी प्रयत्न केले. २६ ऑगस्ट २०१९ ला बुलडाणा पोलिस दलातर्फे सामाजिक ऐक्य परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेला सुध्दा महाविद्यालयाच्या एनसीसी युनिटने आपला सहभाग नोंदविला होता. दिनांक २०सप्टेंबर २०१९ ला 'स्वच्छता ही सेवा' या विषयावर एका परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते या परिसंवादाला अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे वरिष्ठ प्रा.डॉ. सुरेश माळशिखरे हे लाभले होते तर मुख्य मार्गदर्शक म्हणून महाविद्यालयाचे एनएसएस विभाग प्रमुख प्रा.डॉ.सुभाष राऊत हे लाभले होते.

दिनांक २३ सप्टेंबर २०१९ ला स्वच्छता पंधरवाडा अंतर्गत एनसीसी युनिटच्या विद्यार्थ्यांनी स्वच्छतेवर आधारित एक पथनाट्य शहराच्याविविध मुख्य ठिकाणी सादर केले. तसेच सतत पंधरा दिवस स्वच्छता करुन हा पंधरवाडा साजरा केले. दिनांक २४ नोव्हेंबर २०१९ ला महाविद्यालयामध्ये एनसीसी डे साजरा करण्यात आला या कार्यक्रमासाठी प्रमुख




मार्गदर्शक म्हणून श्री शिवाजी कला व विज्ञान महाविद्यालयाचे एनसीसी ऑफिसर प्रा. डी आर.सावळे हे लाभले होते तर अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष गव्हाणे यांनी भूषविले होते.

दिनांक १ डिसेंबर २०१९ ते १५ डिसेंबर २०१९ हा सुध्दा स्वच्छता पंधरवाडा म्हणून साजरा करण्यात आला या दरम्यान १३ डिसेंबरला महाविद्यालयच्या व एनसीसी युनिटच्या विद्यार्थ्यांसाठी 'प्लास्टिक वेस्ट मॅनेजमेंट' या विषयावर सेमिनार आयोजित करण्यात आला होता. या सेमिनारमध्ये एकूण तीस विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदविला होता. तसेच या दिवशी विद्यार्थ्यांना स्वच्छतेशी शपथ देऊन त्यांची एच आय व्ही ची रक्तचाचणी सुध्दा घेण्यात आली होती. दिनांक १५ जानेवारी २०२० ला महाविद्यालयात 'सेना दिवस साजरा करण्यात आला या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे माजी एनसीसी ऑफिसर प्रा. निळकंठ चौधरी हे प्रमुख पाहुणे म्हणून लाभले होते. तर अध्यक्षस्थान हे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुभाष गव्हाणे यांनी भूषविले होते अशा विविध कार्यक्रमाच्या माध्यमातून एनसीसी च्या विद्यार्थ्यांच्या नेतृत्वगुणांना व कलागुणांना तसेच सामाजिक बांधिलकीला वाव देण्यात आला.

शैक्षणिक सत्र २०१९-२० यामध्ये बी सर्टिफिकेटच्या परीक्षेसाठी एकूण ४० विद्यार्थी प्रवेशित झाले होते त्यापैकी २५ एस. डी. व १५ एस.डब्ल्यू असे विद्यार्थी सहभागी होते. तर सी सर्टिफिकेट च्या परीक्षेसाठी एकूण चार एस डी विद्यार्थी प्रवेश झाले होते.

महाविद्यालयाचे एनसीसी युनिट हे नेहमीच विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी व भविष्यासाठी सतत कार्यरत असते कार्य यापुढे सुध्दा महाविद्यालयाच्या एनसीसी युनिट तर्फे होत राहील अशी मनिषा बाळगतो.

**प्रा.शरद रावे**
समन्वयक एन.सी.सी.
असोसीएट एन.सी.सी. ऑफीसर

# विद्यार्थी विकास मंडळ

दरवर्षीप्रमाणे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या एक व्यक्तीमत्वाचा धागा म्हूणन विद्यार्थी विकास मंडळ कार्य करते . विद्यापीठ कायदा अंतर्गत यावर्षी विद्यार्थी निवडणूका झाल्या नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या कलावंताला संधी मिळावी यासाठी विद्यार्थ्यांच्या मागणी नुसार खालील उपक्रम राबविले.

* जन्माष्टमीला दहिहांडी हा उत्सव घेण्यात आला. सुरुवातीला मा.प्राचार्य डॉ. गव्हाणे यांच्याहस्ते दहीहंडी पुजन करण्यात आले. त्यानंतर उत्साहात दहिहंडी संपन्न झाली. याप्रसंगी नृत्यकरुन उत्साह टिकून ठेवला. यात बी.ए.द्वितीय, बी.ए.तृतीय, बी.कॉम. द्वितीय, बी.कॉम.तृतीयच्या विद्यार्थ्यांनी मनोरा करुन दहिहंडी फोडली.

* श्रीगणेश चतुर्थीला श्री गणेशाची स्थापना करण्यात आली. मिरवणुकीने श्री गणेशजीचं आगमन झालं. त्यावेळीस डॉ.सुभाष गव्हाणे यांच्या हस्ते पुजा करण्यात आली. श्री गणेशजींची दररोज आरती प्राध्यापक मंडळी व कर्मचारी यांच्या हस्ते घेण्यात आली.

समारोपाला सर्वांना अन्नदान देण्यात आले. श्री गणेशाच विर्सजन करण्यात आले.

* युवास्पंदन –२०२० हे स्नेहसंमेलन २० ते २६ जानेवारी या दरम्यान पार पडले. दि. २० जानेवारी २०२० रोजी १० वा मा. संतोषजी खबुतरे, संचालक शिक्षण प्रसारक मंडळ,चिखली यांच्या प्रमुख उपस्थितीत क्रीडा स्पर्धेचा उदघाटन सोहळा संपन्न झाला.

त्यात क्रीडा स्पर्धेत क्रीकेट, लगोरी, कबड्डी इ. खेळ संपन्न झाले.

* युवास्पंदन २०२० – स्नेहसंमेलनाचे उद्घाटन संपन्न झाले. या उद्घाटन समारंभाचे अध्यक्ष मा.श्री.रामकृष्णदादा शेटे, अध्यक्ष शि.प्र.मं.चिखली तर उद्घाटक म्हणून मा.डॉ. प्रदिप जावंधीया – प्राचार्य पंकज लध्दड इंस्टी.ऑफ टेक्नॉलॉजी ॲन्ड मॅनेजमेंट, बुलडाणा तर विशेष अतिथी मा.श्री.नारायणराव राजपूत – उपाध्यक्ष शि.प्र.मं.चिखली, मा.भाऊसाहेब लाहोटी, संचालक शि.प्र.मं., मा.श्री. सतीशजी गुप्त, संचालक शि.प्र.मं. मा.श्री अण्णासाहेब डांगे तसेच प्राचार्य डॉ.सुभाष गव्हाणे समन्वयक डॉ. प्रफुल्ल गवई व विद्यार्थी विकास मंडळ प्राध्यापक प्रतिनिधी उपस्थित होते. त्यानंतर सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न झाले.

* २६ जानेवारी युवास्पंदन या स्नेहसंमेलनाचा समारोप व दीक्षान्त समारंभ संपन्न झाला. यात कार्यक्रमाचे अध्यक्ष मा.प्रेमराजजी भाला–सचिव शि.प्र.मं.चिखली तथा श्री कैलासजी शेटे सहसचिव, मा.रामदासजी निमावत–संचालक, तसेच मा.डॉ. सुभाष गव्हाणे, प्राचार्य उपस्थित होते. बी.ए.३ व बी.कॉम.३ मागील वर्षी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना डिग्री देण्यात आल्या.

– **प्रा. डॉ. प्रफुल्ल गवई**
समन्वयक
विद्यार्थी विकास मंडळ

# विद्यार्थी कल्याण विभाग

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती विद्यार्थी कल्याण विभागाच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयात विद्यार्थ्यांचे करियर घडविण्यासाठी तसेच त्यांना विविध ठिकाणी रोजगार उपलब्ध व्हावा या उद्देशाने महाविद्यालयात करियर ॲन्ड प्लेसमेंट सेल आहे.

यात विद्यार्थ्यांकरीता खालील उपक्रम व माहिती देण्यात आली.

१) सत्र २०१९-२० करीता SPM ALUMNI AFTER 2000 व्हॅट्सॲप ग्रुप असून त्यावर विविध वृत्तपत्र, कंपनी, बँक, नोकरी संदर्भात जाहितीती टाकून संपर्क ही सेल करीत असते.

२) दि. ४/०२/२०२० या रोजी मा.डॉ.सुभाष गव्हाणे यांच्या अध्यक्षतेखाली प्लेसमेंट ॲन्ड करियर वर मार्गदर्शन कार्यशाळा संपन्न झाली. या कार्यशाळेत मा.डॉ.राजेश तांबे यांन पाश्चात्य संस्कृत निर्माण होणार रोजगार तर भारतीय संस्कृतीत निर्माण होणार रोजगार तर भारतीय संस्कृतीत निर्माण होणार रोजगार याबाबत विद्यार्थ्यांशी संवाद साधला तर या प्रसंगी डॉ. एस.पी.घिसाळ यांनी मार्गदर्शन केले याप्रसंगी नगरसेवक मा.पंडीतराव देशमुख उपस्थित होते.

३) दि.७/२/२०२० रोजी Global Talent Track तर्फे प्लेसमेंट आयोजित जी.एम.महाविद्यालय खामगांव येथे जाण्यासंदर्भात विद्यार्थ्यांना अवगत करण्यात आले तसेच फोन देखिल करण्यात आले.

४) MS-CIT २१ व्या शतकातील जॉब रेडीनेस देण्याऱ्या कोर्सबाबत प्रा.नन्हई यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन.

– **प्रा. डॉ. प्रफुल्ल गवई**
समन्वयक
विद्यार्थी कल्याण विभाग

# सांस्कृतिक विभाग



महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा शैक्षणिक विकासाबरोबरच सांस्कृतिक विकास होण्याच्या दृष्टीकोनातून महाविद्यालय स्तरावर तसेच विद्यापीठ स्तरावर विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केल्या जाते. यातील विशेष म्हणजे संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती व्दारे युवा महोत्सव होय.

सन २०१९-२० चा युवा महोत्सव शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था अमरावती येथे दि. ३०/९/१९ ते ३/१०/१९ या दरम्यान संपन्न झाला. सदर युवा महोत्सवात महाविद्यालयातील एकूण २० विद्यार्थ्यांनी विविध कला प्रकारामध्ये सहभाग नोंदविला. वादविवाद व वकृत्व स्पर्धेत १) निलेश समाधान जाधव २) रोहित भूपेंद्र जाधव बी.ए.२ लोकनृत्य कला प्रकार बी.कॉम. २ १) निलेश राजु पाटील बी.ए.२ २) स्वप्नील काशिनाथ सुरडकर ३) कु.अंकिता विजय जाधव बी.ए.२ ४) कु. कविता शिवाजी खानझोडे बी.ए.२ ५) कु. प्रगती गजानन टाक बी.कॉम.६) कु.शिवानी उदय करवा बी.कॉम. २ ७) कु. अनुष्का श्रीपाद दाभाडकर बी.कॉम.२ ८) यश किशोर भालेराव बी.कॉम. २ ९) ऋषिकेश मनोहर जाधव बी. कॉम. २ १०) कुंदन दुर्गादास असोलकर.

समुहगान भारतीय : १) कु. शिवानी उदय करवा बी.कॉम. २, २) अनुष्का श्रीपाद दाभाडकर ३) कु. शाहिन घाशी नंदावाले बी.कॉम. २ ४) कु. अपुर्वा विजय जाधव बी.ए.३ ५) कु.शुभांगी गजानन जाधव बी.कॉम. २ ६) कु.पुजा अनिल काळे.

प्रश्नमंजुषा : १) कु. परविन अय्युब नवरंगी बी.ए.३ २) प्रविण किशोर जाधव बी.ए.३ ३) निलेश समाधान जाधव

